श्री नेत्रालय हॉस्पिटल
नवीन जागेत
विश्वकर्मा कॉम्प्लेक्स, १ ला मजला,
दत्तमंदिर चौक, देवपूर, धुळे
- कॉम्प्युटरच्या सहाय्याने डोळे तपासणी व उपचार
- फेको पद्धतीने व बिनटाक्याच्या पद्धतीने माफक दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येईल.
- तपासणी वेळ : संध्या. ४ ते रात्री ९ पर्यंत
मो.नं.९५१८३९७५९२ / ९४२१५१७६६३

# आपला महाराष्ट्र

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

मूल्य २.००

POST REGD.NO./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१६९ ■ रविवार ३० मार्च २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

घरचा स्वाद,
घरची शुध्दता...
शुद्ध खा.. स्वस्थ रहा
नवल®
शुध्द घी
म्हशीचे व गायीचे साजुक तुप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड,धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com

## म्यानमार, थायलंडमधील भूकंपात हजाराहून अधिक ठार
## शनिवारी पुन्हा धक्के; अनेक इमारती, पूल जमिनदोस्त

**बँकॉक/नेपडा, दि.२९- म्यानमारला शुक्रवारी शक्तिशाली भूकंपाचे हादरे बसले, ज्यामध्ये एक हजाराहून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. यानंतर पुन्हा एकदा शनिवारी दुसरा एक ५.१ तीव्रतेचा भूकंप झाला आहे. युनायटेड स्टेट जिओलॉजिकल सर्वे (युएसजीएस) ने याबद्दल माहिती दिली आहे. या भूकंपाने म्यानमार, थायलंडमध्ये अक्षरशः हाहाकार माजला आहे. जगभरातून येथे मदतीचा ओघ सुरु झाला आहे.**

शनिवारी दुपारी २.५० वाजता म्यानमारची राजधानी नायपीडाव जवळ १० किमीच्या खोलीवर भूकंपाचे धक्के बसले अशी माहिती युएसजीएसने दिली आहे. शनिवारी झालेल्या भूकंपामुळे किती नुकसान झाले तसेच यामध्ये जीवितहानी किती झाली याची माहिती अद्याप मिळालेली नाही. शुक्रवारी देखील याच ठिकाणी भूकंपाचे धक्के बसले होते. नायपीडाव शहरातील बहुतेक भागातील बंद पडलेली वीज, फोन आणि इंटरनेट सेवा खराब झालेले रस्ते दुरुस्त करण्याचे काम अधिकाऱ्यांकडून केले जात असतानाच पुन्हा भूकंपाचे हादरे बसले. म्यानमारला ७.७ रिश्टर स्केलच्या शक्तिशाली भूकंपाचे धक्के बसला आणि त्यानंतर अवघ्या ११ मिनिटांत दुसरा ६.४ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाचा धक्का बसला. ज्यामुळे देशभरातील इमारती, पूल, ऐतिहासिक वास्तू, रस्ते आणि इतर अनेक पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



प्रशासनाने जारी केलेल्या ताज्या अंदाजानुसार या भूकंपात किमान एक हजाराहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे आणि दोन हजार तिनशेहून अधिक जखमी झाले आहेत. मदतकार्य करणाऱ्या यंत्रणांकडून ढिगाऱ्यातून मृतदेह बाहेर काढले जात आहेत. यादरम्यान लष्कराच्या नेतृत्वाखालील (पान ७ वर)

## छत्तीसगडमध्ये चकमक सोळा नक्षलवादी ठार

गडचिरोली, दि.२९- छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यातील केरलापालच्या जंगल परिसरात सुरु असलेल्या चकमकीत सोळा नक्षलवाद्यांना ठार करण्यात सुरक्षा दलाला यश आले आहे. आज, सकाळी आठ वाजता पासून ही चकमक सुरु असून मृत नक्षलवाद्यांची संख्या वाढू शकते, अशी शक्यता छत्तीसगड पोलिसांनी वर्तवली आहे. सुकमा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्याच्या केरलापाल जंगल परिसरात मोठ्या संख्येने नक्षलवादी एकत्र आल्याची गोपनीय माहिती सुरक्षा दलाला मिळाली होती. यावरून सुकमा पोलीस दलाचे डीआरजी पथक आणि बिजापूर जवानांनी २८ मार्च रोजी रात्रीच्या (पान ७ वर)

## आदिवासी वनहक्क कायद्यासह विविध मागण्यांसाठी सत्यशोधक सभा, कष्टकरी सभेचे प्रशासनाला निवेदन



**नंदुरबार, दि.२९ (प्रतिनिधी)- आदिवासी वनहक्क कायद्याची योग्य अंमलबजावणी करा यासह विविध मागण्यांसाठी आज सत्यशोधक शेतकरी सभा व सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ.मिताली सेठी यांना निवेदन देण्यात आले.**

आदिवासी वन हक्क कायद्याची योग्य अंमलबजावणी करावी, भांगडा, वसलाई शिवारसह आदिवासी जमिनीतून भेदखल करण्यासाठी वन खात्याने एसआरपी मार्फत दहशद निर्माण केली आहे ती ताबडतोब थांबवण्यात यावी, मुख्यमंत्री यांनी सत्यशोधक कष्टकरी सभेच्या कार्यकर्त्यांना पायी बिऱ्हाड मोर्चाच्या वेळेस दिलेली लेखी आश्वासनाची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी, वनहक्क समितीने काढलेली अंतिम नोटीस रद्द करून पुरा प्रलंबित सह अपात्र केलेले व सर्व वनदावेदाराची योग्य स्थळपाहणी, जीपीएस नोंदणी करून पुराव्याची योग्य फेरतपासणी करत कसत असलेल्या जमिनीचा सातबारा उतारा द्यावा, २०२३ चा वन कायदा हा आदिवासी वनहक्क कायदा २००६ व नियम २००८ तसेच सुधारणा अधिनियम २०१२ नुसार आदिवासी दावेदारांना जल जंगल जमिनीवर (पान ७ वर)

## बनावट पनीर निर्मिती करणाऱ्या डेअरीवर छापा एलसीबीची कारवाई; रसायनांसह साहित्य जप्त

**धुळे,दि.२९-शहराजवळील अवधान एमआयडीसी येथील शौर्य डेअरीत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पहाटे पाच वाजेच्या सुमारास छापा मारला. या ठिकाणी अडीचशे किलो बनावट पनीरचा साठा आढळून आला तसेच बनावट पनीर बनविण्यासाठी लागणारे साहित्य, रसायने, दुधाची भुकटी, दुध तापवायचे मशिन असे साहित्य ताब्यात घेण्यात आले. दरम्यान अन्न व औषध प्रशासनाने पथकही दाखल झाल्याने भेसळयुक्त पनीर बनविण्याचा काळाबाजार भल्या पहाटे उघडकीस आल्याने संपूर्ण शहरात एकच चर्चेचा विषय ठरला.**



सणासुदीच्या काळात मांसाहार वर्ज्य असलेली मंडळी पनीर खाण्याला प्राधान्य देते. शहरातील अवधान एम.आय.डी.सी. येथे शौर्य डेअरी आहे. या डेअरीत बनावट पनीर तयार केले जात असल्याची कुणकुण लागताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पहाटे पाच वाजेच्या सुमारास शौर्य डेअरीवर छापा मारला. शौर्य डेअरीत तयार करण्यात आलेल्या पनीरची तपासणी केली असता पनीरचा रंग काळा पडल्याने पनीर बनावट असल्याचे उघड झाले. पनीरचे नमुने शासकीय प्रयोगशाळेत रवाना करण्यात येणार आहेत. शौर्य डेअरीचे मालक सोमनाथ गवळी, कैलास गवळी व सुहास गवळी हे तिघेही उत्तर (पान ७ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -82,450 रु.+3% GST
सोने- 24 K -90,000 रु.+3% GST
चांदी- 1,05,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## धुळे कृऊबातून कार लांबवली

धळे, दि.२९- धुळे कृषी उत्पन्न बाजार समिती येथे लावलेली स्वीफ्ट डिझायर कार अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना घडली आहे.निंबा रामा पाटील यांनी दि.२८ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात स्विफ्ट डिझायर कार क्र. एमएच ०२/डीएन- ९७८८ लावलेली होती. अज्ञात चोरट्याने दि.२७ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास एक लाख पंचवीस हजार पाचशे रूपये किंमतीची कार चोरून नेली. या प्रकरणी आझादद नगर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

२९ रोजा
३० मार्च इफ्तार ६.४७
ईद मुबारक



## पोलीस दलाने राबविली ऑपरेशन ऑल आऊट मोहिम; पिस्तुलासह मुद्देमाल जप्त

**धुळे, दि.२९- सण आणि उत्सवांच्या पार्श्व भूमीवर नाकाबंदीसह ऑपरेशन ऑल आऊट मोहिम पोलीस दलाने सायंकाळी पाच ते रात्री दहा या कालावधीत राबविली. या मोहिमेतंर्गत तीन पिस्तुल, जीवंत काडतूस तसेच दरोडा घालण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या सहा जणांना पकडले. अवैध मद्यसाठा तसेच पसार झालेले आरोपींनाही पकडण्यात यश आले.**

दरोडा घालण्याच्या उद्देशाने फिरणारे सहा जणांना जेरबंद केले असून त्यांच्याकडून दोन वाहनांसह वेगवेगळे साहित्य, शस्त्र, गावठी बनावटीचे पिस्तुल, जीवंत काडतुस हस्तगत केले. जिल्ह्यात वेगवेगळ्या ४२ ठिकाणी छापा मारून दोन लाख दोन हजार दोनशे सत्तर रूपये किंमतीची गावठी दारू पकडण्यात आली. चार लाख सत्त्याऐंशी हजार शंभर रूपये किंमतीची विदेशी दारू कारसह ताब्यात घेतली. विविध गुन्ह्यांमधील पोलीसांना हवे असलेले परंतू पसार झालेले आरोपीही जेरबंद करण्यात पोलीस दलाला या मोहिमेच्या माध्यमातून यश आले आहे. त्यात एल.सी.बी.च्या पथकाने तीन, चाळीसगाव रोड पोलीसांनी एक अशा एकुण चार पसार झालेल्या आरोपींना गजाआड करण्यात आले आहे. एल.सी.बी. आणि शिरपूर शहर पोलीस यांनी प्रत्येकी दोन असे एकुण चार हद्दपार आरोपींना पकडण्यात आले. दारू पिऊन वाहन चालविणाऱ्या सात जणांना पकडले असून त्यांच्यावर सत्तर हजारांचा दंड देण्यात आला. कुख्यात गुन्हेगारांची सखोल चौकशी करण्यात आली. जिल्ह्यातील हॉटेल, बार, लॉजेस गेस्ट हाऊस अशा सत्त्याहत्तर ठिकाणी कसून तपासणी करण्यात आली. जिल्ह्यात पंचवीस ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली. या कारवाईसाठी बावीस पोलीस अधीकारी, शहाऐंशी पोलीस कर्मचारी व साठ होमगार्ड यांनी कारवाई केली.

## मनपाचे पाणी महागले एप्रिलपासून वाढीव दर

धुळे, दि.२९- महापालिकेने पाणी विक्रीच्या दरात दि.१ एप्रिल २०२५ पासून नवीन दराने पाणी विक्रीचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने महापालिकेचे वाहन, खाजगी टँकर तसेच एक हजार लिटरसाठी पाचशे रूपये किंवा क्षमता तपासून आकारणी केली जाणार असल्याचे प्रशासनाने निश्चित केले आहे. प्रशासकांनी दि.२० मे रोजी दिलेल्या ठरावानुसार पाणी विक्री दरात वाढ करण्यात आली आहे. मनपा वाहनाद्वारे पाणी न्यावयाचे असल्यास एक हजार चाळीस, खाजगी टँकर क्षमता पाच हजार लिटर चारशे रूपये. पाच हजार किंवा अधिक क्षमतेच्या टँकर त्यापुढील पाच हजार लिटरसाठी पाचशे प्रमाणे आकारणी केली जाईल. सुधारित दर दि.१ एप्रिल २०२५ पासुन लागू करण्यात येणार आहेत. नागरिकांनी महापालिकेस सहकार्य करावे. असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील यांनी केले आहे.

SVKM NMIMS Global University

SVKM NMIMS
Global University



Admission Open
2025-26

For more details kindly visit below website
www.svkmnmimsgu.ac.in

Qualifying Entrance Exams: MHT-CET / JEE / NEET / NCET / SAT / PERA-CET / NPAT / GATE / GPAT

Behind Gurudwara, Mumbai-Agra Highway, Dhule, Maharashtra 424001.

School of Pharmacy & Technology Management (SPTM)
- D.Pharm
- B.Pharm
- M.Pharm
- B.Pharm + MBA (Pharma Tech)
- B.Tech (Cosmetic Technology)
- Ph.D. (Pharmaceutical Sciences)
(Pharmaceutical Quality Assurance | Pharmaceutics
Pharmacology | Pharmaceutical Chemistry)
91589 47999 / 86685 01496

School of Commerce (SOC)
- BBA (Bachelor of Business Administration)
- BCA (Bachelor of Computer Applications)
92721 10073 / 87887 01642

School of Technology Management & Engineering (STME)
- B.Tech (Civil Engineering | Computer Engineering | Electrical Engineering
Information Technology | Mechanical Engineering
Computer Science & Engineering (AI&ML)
Computer Science & Engineering (Data Science)
- B.Tech + MBA (Tech Management) (Computer Engineering
Computer Science & Engineering (AI&ML) | Computer Science & Engineering (Data Science)
Information Technology)
- M.Tech (Civil Engineering | Computer Engineering | Electrical Engineering
Information Technology | Mechanical Engineering)
- MCA (Master of Computer Application)
- Ph.D. (Technology / Engineering)
94256 85966 / 97644 05069

# जयनगर येथे शुद्ध पाणी पुरवठा केंद्राचे उद्घाटन महिला सक्षमीकरण अंतर्गत प्रमाणपत्राचे वाटप

**शहादा, दि.२९ (प्रतिनिधी) - तालुक्यातील जयनगर येथे ग्रामपंचायतच्यावतीने नव्याने टाकण्यात आलेल्या शुद्ध पाणी पुरवठा (आरओ प्लांटचे) केंद्राचे व महिला बचत गट कार्यालयाचे उद्घाटन गटविकास अधिकारी विकास राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच गावात महिला सक्षमीकरण उपक्रमा अंतर्गत चालविलेल्या शिवण क्लास व ब्युटी पार्लरच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.**

शहादा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी विकास राठोड यांनी जयनगर येथे विविध विकास कामांची पाहणी केली. तसेच ग्रामपंचायतच्या वतीने टाकण्यात आलेल्या शुद्ध पाणी पुरवठा केंद्राचे उद्घाटन केले. जयनगर



येथे गावातील तसेच परिसरातील नागरिकांना कमी दरात आरअ-ेचे पाणी उपलब्ध होणार आहे. तसेच गावात महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत चालवलेल्या शिवण क्लास व ब्युटी पार्लर महिला लाभार्थ्यांना गटविकास अधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. शिवण क्लास प्रशिक्षणासाठी माधुरी माळी व कविता माळी यांनी काम पाहिले. शिवण क्लास व ब्युटी पार्लर प्रशिक्षणासाठी सक्षम नारी अभियान युवा रोजगार सोसिअल वेलफेअर असोसिएशन, नाशिक संस्थेचे जिल्हा समन्वयक सुभाष जाधव आणि तालुका समन्वयक संगीता जाधव, संदीप कुवर यांचे सहकार्य लाभले. तसेच गटविकास अधिकारी यांनी जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी यांना भेट देऊन तेथील पोषण आहाराची माहिती जाणून घेतली. जि.प शाळेत वृक्षारोपण करण्यात आले. गावातील रस्ते, पाण्याची व्यवस्था, आदी कामाची चौकशी करून समाधान व्यक्त केले. तसेच जिल्ह्यात जयनगर ग्रामपंचायत विकासाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे सांगितले. यावेळी उपसरपंच ईश्वर माळी यांनी गटविकास अधिकारी व ग्रामस्थांना गावातील विकास कामांविषयी माहिती दिली. तसेच महिला सक्षमीकरणसाठी अजून आमच्या ग्रामपंचायतच्यावतीने विविध उपाययोजना राबवण्याच्या प्रयत्न करू असे सांगितले.

यावेळी वरिष्ठ सहाय्यक पंचायत समिती शहादा अनिस पिंजारी, सरपंच मोगराज सोनवणे, गटनेता तथा उपसरपंच वनश्री ईश्वर संतोष माळी, ग्रामसेवक अनिल ठाकरे, ग्रामपंचायत सदस्य शरद गोपाळ पाटील, सिंधुबाई सहारे, मंगलाबाई माळी, बचत गट अध्यक्ष शितल पाटील, संतोष पारधी, मोहन पारधी, हिरालाल माळी, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच ग्रामस्थ व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# प्रा.डॉ.शशिकला पवार यांची साहित्य परिषदेवर निवड

धुळे, दि.२९- धुळे आणि नंदुरबार जिल्हा प्रतिनिधी प्रा.डॉ.शशिकला बबनराव पवार यांची महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या संस्थेवर विभागीय कार्यवाहपदी साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत एकमताने निवड करण्यात आली. महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणेचे कार्याध्यक्ष प्रा.मिलिंद जोशी यांच्या हस्ते कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी आणि सदस्य यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मसाप, पुणेच्या प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी आणि सदस्यांनी,शिवाय मसाप धुळे व नंदुरबार जिल्हा शाखांच्या सभासदांनी, मान्यवरांनी प्रा.डॉ. शशिकला पवार यांचे अभिनंदन केले.



# धुळ्यात ग्लॅमरस आयकॉन मॉडेलिंग स्पर्धा संपन्न

**धुळे, दि.२९- शहरातील गेमचेंजर प्रोडक्शन हाऊस तर्फे महाराष्ट्राचे ग्लॅमरस आयकॉन २०२५ भव्य मॉडेलिंग स्पर्धा नुकतिच घेण्यात आली. तीन गटांत घेण्यात आलेल्या या स्पर्धेत राज्यातील छपन्न स्पर्धकांनी सहभा नोंदवला.**

शहादा येथील दर्शन धोबी याने मिस्टर गटातून ग्लॅम आयकॉन महाराष्ट्र २०२५, धुळ्यातील रितीका पाटील यांनी मिस गटातून तर टीन गटातून बदलापूर येथील रितीका साळुंखे यांनी ग्लॅम आयकॉन ऑफ किड्स हा बहुमान मिळवला. प्रिया वेंदे यांनी मिसेस महाराष्ट्र हा खिताब पटकावला तसेच बाल गटातून प्रिषा टेकवाणी यांनी ग्लॅम आयकॉन ऑफ किड्स बहुमान मिळवला. या स्पर्धेचे दिग्दर्शक व निर्देशक शरद उगले, मिस हेरीटेज इंडिया असलेल्या गायत्री ठाकूर यांनी केले. धुळे शहरात पहिल्यांदाच अशी भव्य स्पर्धा घेण्यात आली त्यात गेमचेंजर प्रोडक्शन हाऊसेच अनिकेत गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांचा सहभाग होता. असे दिग्दर्शक शरद उगले यांनी सांगितले.

# एच.आर. पटेल फार्मसीत सॉफ्ट स्किल विकास कार्यक्रम संपन्न

**शिरपूर, दि.२९- एच.आर. पटेल औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर येथे प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान (पीएम उषा), नवी दिल्ली व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय सॉफ्ट स्किल विकास कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.**

विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल्सच्या क्षेत्रातील महत्त्वाच्या बाबींबद्दल माहिती देण्यासाठी विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन क.ब.चौ. उ.म. विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. गजानन पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी. बारी, समन्वयक डॉ. व्ही.के. चटप आदि मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.



कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात आंतरवैयक्तिक कौशल्ये आणि नेतृत्व विशेषज्ञ एजाज एम. शेख यांनी विद्यार्थ्यांसमोर आंतरवैयक्तिक कौशल्यांचे महत्त्व आणि प्रभावी नेतृत्व कसे विकसित करता येते, यावर प्रकाश टाकला. दुसऱ्या सत्रात प्रभावी संवादकला प्रा.सुरेश पांडे यांनी संवादाच्या प्रभावी तंत्रावर विस्तृत मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात वेळ व्यवस्थापन आणि कार्य नैतिकता यावर प्रा. मिलकेश जैन यांनी वेळेचे कुशल व्यवस्थापन कसे करावे आणि शैक्षणिक तसेच व्यावसायिक यशासाठी कार्य नैतिकतेचे महत्त्व स्पष्ट केले. चौथे सत्र समस्या सोडवणे आणि विश्लेषणात्मक कौशल्य बाबत प्रा.सलिल सबनीस यांनी समस्यांचे विश्लेषण कसे करावे व त्यावर उपाययोजना कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे समन्वयन डॉ.व्ही. के. चटप, सह-समन्वयक प्रा. कल्याणी राजपुत, पीएम उषाचे विद्यापीठाचे प्रकल्प प्रमुख डॉ. आशुतोष पाटील, समन्वयक डॉ. एस आर कोल्हे, सह प्रकल्प समन्वयक डॉ. उज्वल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रा.डी.एम. पाटील, प्रा.व्ही.एस. बागुल, प्रा.एस.के. आमले, प्रा.संजना चोरडिया यांनी प्रयत्न केले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासासाठी आवश्यक सॉफ्ट स्किल्सच्या बाबतीत प्रोत्साहित करताना, प्रभावी संवाद, नेतृत्व, वेळेचे व्यवस्थापन आणि समस्यांचे विश्लेषण यांसारख्या महत्त्वाच्या बाबींचे प्रशिक्षण देण्यात यशस्वी ठरला. विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून नविन उमेद आणि उपयोगी ज्ञान प्राप्त केले, जे त्यांच्या उज्वल भविष्यासाठी मोलाचे ठरेल.




# धुळे सीए शाखेत विद्यार्थ्यांसाठी बँक ऑडिट सेमिनार संपन्न

**धुळे दि.२९- इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया पश्चिम विभागा अंतर्गत कार्यरत धुळे सीए शाखेत सीए शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी बँक ऑडिट या विषयावर एक दिवसीय सेमिनारचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.**

जेष्ठ सनदी लेखापाल व सीए शाखेचे माजी अध्यक्ष सीए राजाराम कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना बँक ऑडिट संदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे व प्रत्यक्ष लेखापरीक्षणा दरम्यान घ्यायची दक्षता, बिल्स, व्हॉऊचर्स, रिसीट, पेमेन्ट व आवश्यक कागदपत्रे इ बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. धुळे सीए शाखा विद्यार्थी संघटना अध्यक्षा सीए सोनी सोनार, उपाध्यक्ष भावेश बागुल, खजिनदार पलक मोदी, सचिव वैष्णवी बागुल, भावना सदाणे, आंचल गुंडीयाल, मेहक चोपडा, मिताली कुचेरिया यांनी या सेमिनारचे उत्तम संयोजन केले. सीए सोनी सोनार यांनी प्रास्ताविकातून सेमिनारची संकल्पना मांडली. याप्रसंगी प्रमुख वक्ते सीए राजाराम कुलकर्णी यांनी प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. सीए शाखेचे विद्यार्थी विद्यार्थीनी यांची सेमिनारला चांगली उपस्थिती लाभली होती.

## विद्यार्थ्यांचे यश

धळे, दि.२९- साक्री तालुक्यातील पिंपळनेर येथील कै.नानासाहेब साहेबराव पंडीत पाटील माध्य. व उच्च माध्य. विद्यालयातील सहा विद्यार्थ्यांची जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परिक्षेत निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सुभाष जगताप, महेंद्र गांगुर्डे, बारकू शिरसाठ आदींनी अभिनंदन केले आहे.

# काँग्रेस पक्षात संघटनात्मक फेरबदल जिल्हानिहाय निरीक्षकांची नियुक्ती



**मुंबई दि.२९- काँग्रेस पक्षाला नवी ऊर्जा आणि बळ देण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी संघटनात्मक फेरबदलाची प्रक्रिया सुरु केली आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून आज काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची जिल्हानिहाय निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या अहवालानंतर संघटनेत बदल करण्यात येणार आहेत.**

फेरबदलाच्या या प्रक्रियेत बुथ स्तरापासून प्रदेश पातळीपर्यंत काँग्रेस संघटना मजबूत करण्यासाठी आवश्यक ते बदल केले जाणार आहेत. रिक्त पदावर नियुक्त्या करण्यात येणार आहेत. तसेच अनेक वर्षापासून एकाच पदावर असणाऱ्यांच्या जागी नवीन चेहऱ्यांना जबाबदारी दिली जाणार आहे. या संदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या निरीक्षकांची बैठक आज प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत प्रांताध्यक्षांनी निरीक्षकांना यासंदर्भात सूचना केल्या. हे सर्व निरीक्षक त्यांना नेमून दिलेल्या जिल्ह्यात जाऊन काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधून पंधरा दिवसांत प्रदेश काँग्रेसला आपला अहवाल सादर करणार आहेत. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संघटनात्मक फेरबदलांच्या प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.

# राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमात शहरी भागातून धुळे महानगरपालिका राज्यात द्वितीय

**धुळे, दि.२९- राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील शहरी भागात धुळे महानगरपालिका क्षेत्रात सन २०२४ मध्ये क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात आल्याने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे.**

केंद्र सरकारने राज्यांना दिलेल्या निर्देशांकानुसार क्षयरोग कार्यक्रमात द्वितीय रँकिंग प्राप्त केली आहे आणि संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सर्व महापालिका व सर्व जिल्हे असे एकूण ८० युनिटमध्ये धुळे महापालिका राज्यात नवव्या क्रमांकावर आहे. २६ मार्च रोजी राज्य शासनाने निर्गमित केलेल्या रँकिंगमध्ये धुळे महानगरपालिकेला ८७.०६ गुण प्राप्त झालेले आहेत. शहर क्षयरोग अधिकारी डॉ.जे.सी.पाटील यांच्या नेतृत्वात शहर क्षयरोग कार्यालयातील सर्व कर्मचारी वर्ग, महानगरपालिकेतील सर्व वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अंतर्गत काम करणारा स्टॉफ यांच्या व खाजगी क्षेत्रातील संस्था, पीपीएसए यांच्या सर्वांच्या सहकार्याने हे यश मिळालेले आहे. क्षयरोग आरोग्य कार्यक्रम व उपक्रमांची महानगरपालिका क्षेत्रात प्रभावी अंमलबजावणी झाल्याने धुळे महानगरपालिका राज्यात राज्यातील सर्व महापालिकांमध्ये द्वितीय क्रमांकवर येण्याचा बहुमान मिळालेला आहे. आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील, अति.आयुक्त करुणा डहाळे व उपायुक्त शोभा बाविस्कर यांचे क्षयरोग कार्यक्रमास वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.

# शिरपूर येथे एस.व्ही.के.एम., एन.एम.आय.एम.एस. कॅम्पसमध्ये आयसीएनजीटी आंतरराष्ट्रीय परिषदेचा शुभारंभ

**शिरपूर, दि.२९- एस.व्ही.के.एम., एन.एम.आय.एम.एस. शिरपूर कॅम्पस येथे शाश्वत विकासासाठीच्या पुढील पिढीच्या तंत्रज्ञानावर आधारित आंतरराष्ट्रीय परिषद आयसीएनजीटी-२०२५ ची सुरुवात अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात उद्घाटन समारंभाने झाली.**

या कार्यक्रमाचे उदघाटन संस्थेचे व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, शिरपूर कॅम्पसच्या प्रभारी सौ.रीता पटेल यांच्या हस्ते करण्यात आले.



कार्यक्रमात ऑनलाइन स्वरूपात एन.एम.आय.एम.एस. कुलगुरू डॉ.रमेश भट, प्र-कुलगुरू डॉ. शरद म्हैसकर व डॉ.मीना चिंतामनेनी यांनी सहभाग घेतला आणि परिषदेबद्दल शुभेच्छा देऊन कौतुक केले.शिरपूर कॅम्पसच्या संचालक व परिषदेच्या अध्यक्षा डॉ.सुनीता आर. पाटील यांनी परिषदेची माहिती दिली. परिषदेचे प्रमुख अतिथी डॉ.दीपक तलवार (मुख्य एआय व सायबर सुरक्षा अधिकारी, ॲस्टेरिया व्हिजन, सिंगापूर) यांनी एआय आणि मानव सहजीवन : न्याय व सक्षम तंत्रज्ञान भविष्यासाठी या विषयावर विषयावर महत्त्वपूर्ण विचार मांडले. पुढील सत्रांमध्ये वसंतदादा साखर संस्था, पुणे येथील पीक उत्पादन व संरक्षण विभाग प्रमुख वैज्ञानिक डॉ. अशोक कडलग यांनी ऊस उत्पादनातील आव्हाने आणि संधी या विषयावर भाष्य केले. त्यांनी हवामान बदल, पाण्याची टंचाई, कीड प्रादुर्भाव आणि बाजारातील अस्थिरता यांसारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले, जे ऊस उत्पादन आणि त्याच्या शाश्वततेवर परिणाम करतात. या दिवसाचे मुख्य आकर्षण म्हणजे तोंडी आणि भित्तीपत्रक सादरीकरण झाले. पुढील सत्रात डॉ.हरमीत सिंग (कॅलिफोर्निया स्टेट पॉलिटेक्निक युनिव्हर्सिटी, अमेरिका) यांचे अमेरिकेमधील शाश्वत शेतीचे भविष्य यावर व्याख्यान होणार आहे. डॉ. सुधांश रेड्डी (एआय/एमएल, पूर्वी डेटा सायन्स), युनायटेड स्टेट्स) यांचे पर्यावरणीय निरीक्षण आणि संसाधन व्यवस्थापनासाठी स्वयंचलित एआय एजंट्स यावर सत्र होणार आहे. डॉ. सुधर्शन सिंग (चियांग माई युनिव्हर्सिटी, थायलंड) यांचे कर्क्युमिन मेटाबोलाइट चे स्थिरीकरण आणि त्याची कार्यक्षमता वाढवण्यासाठी लिपिड वेसिकल एन्कॅप्सुलेशन व डी -प्रिंटेड कंपोझिट बळकटीकरण यावर सत्र होणार आहे. तसेच डॉ. वंदना पत्रावळे (रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई) यांचे पेप्टाइड डिलिव्हरी साठी नॉन-इन्वेसिव्ह धोरणांवर सादरीकरण होणार आहे. यासोबतच प्रतिनिधींकडून तोंडी आणि भित्तीपत्रक सादरीकरणे देखील होतील. परिषदेने शाश्वत विकासासंबंधी यशस्वी चर्चा घडवून आणल्या.

# सिसोदे महाविद्यालयात विद्यापीठ परीक्षा संदर्भात उद्बोधन वर्गाचे उद्घाटन

**धुळे, दि.२९- कबचौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु प्रोफेसर डॉ.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या निर्देशानुसार विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षा २०२५ च्या कामकाजाबाबत विद्यापीठ जिल्हास्तरीय परीक्षा समितीतर्फे ग्रामिण विकास शिक्षण मंडळ संचलित कै.भाऊसाहेब एम.डी. सिसोदे महाविद्यालयात उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले.**

याप्रसंगी विद्यापीठ सिनेट सदस्य प्रा.डॉ.गजानन पाटील यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.पी.एस. गिरासे होते. उपप्राचार्य डॉ.यू.जी. पाटील, उपप्राचार्य डॉ.एन.के. पाटील सर्व अनुदानित, विनाअनुदानित, तासिका तत्वावरील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रा.डॉ. गजानन पाटील यांनी विद्यार्थी हितासाठी कॉपी व तनावमुक्त परीक्षा पार पडून वेळेवर निकाल लागावेत यासाठी कुलगुरु प्रा.माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापिठाने तयार केलेल्या मानक कार्यप्रणालीनुसार परीक्षा कालावधीत परीक्षार्थी, कनिष्ठ पर्यवेक्षक, वरिष्ठ बहिस्थ व अंतर्गत पर्यवेक्षक, अंतर्गत तपासनी पथक, बहिस्थ भरारी पथक, परीक्षक व मॉडरेटर आदी घटकांच्या भूमिका व जबाबदाऱ्या याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ.पाटील यांनी सूत्रसंचालन व आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परीक्षा विभाग प्रमुख प्रा.व्ही.बी. खैरनार, डॉ.बी.एम. पाटील, डॉ. राहुल भदाणे, प्रा.देवेंद्र पाटील, संदीप निकम, संजय बोरसे व शैलेंद्र सिसोदे यांनी परिश्रम घेतले.

## शब्दकोडे क्रमांक : २१२१



आडवे शब्द : १.देवानंद,वहीदा रहमान यांनी एकत्रित काम केलेला सिनेमा ४.गरदन ५.मत्स्य ७.मोजदाद करावयाचे परीमाण ९.आमटीत तिखटपणा येण्यासाठी वापरतात ११.तब्बू, अनिल कपूर यांचा एक सिनेमा १२. हिंदीत 'स्फोटकांची दारू' १३.विविध १४.खोटी बातमी १५.गाणे १६.जगी-उलट लिहा १८.शंभर २१.एक म्हण ' सौ सुनार की - - लोहार की' २२.मग्न २४.प्रिया बापट,सई ताम्हणकर यांनी एकत्रित काम केलेला सिनेमा २७.प्रामाणिक २८.गोंगाट ३०. आर्श्चर्य ३१.पथ ३२.रक्त ३४.निष्कलंक ३५.इंग्रजीत-जा ३६.रानरेडा ३८.भेट ३९.१९७६ रोजी सनी कपूर, शबाना आझमी यांचा प्रदर्शित झालेला एक सिनेमा ४१.शर्त ४२.रहस्यमयी ४४.परवडणाऱ्या दरातला ४६.मेहनत ४७.तो- विरुद्ध ४९.मस्तीखोर ५१.त्रास ५३.घराणे ५४.आक्षेप ५५.खुंट- विरुद्ध उभे शब्द : १.सागराच्या लाटांचा नाद ३.शंकराचे वाद्य ४.हार ५.एक माधव भक्त दासी ६.प्रजात ८.उपकाराची केलेली परतफेड १०.साधेपणा ११.विध्वंस १२.देवानंद,वहीदा रहमान यांचा एक सिनेमा १७. जीर्ण झालेला १९.तुज २०.पशू २३.हिंदीत-तेव्हा २५.प्रजा २६.हिंदीत-डाळ २९.ऋषी कपूर, सलमान खान, अमिषा पटेल,रती अग्निहोत्री यांचा एक सिनेमा ३३.भेट ३४.प्रवास ३६.समूह ३७.अधम ३८.गोमाता ४०.पोपट ४१.न विटणारा; पक्का (रंग); चवदार ४२.कथा ४३.बेचव ४५.जन्म ४६. भारताच्या ओडिसा प्रांतातील एक शहर ४८.रत ५०. पत्र ५१.नौका ५२.दीप

शब्दकोडे क्रमांक : २१२० चे उत्तर















## गुढीपाडवा: अध्यात्म,ज्ञान विज्ञानाचा मिलाफ!

प्रा.पुरुषोत्तम सुपीबेन म.पटेल
पुणे, मो. ८२०८८४१३६४

भारतात प्रत्येक धर्मातील सण-उत्सव अत्यंत आनंदाने साजरा केले जातात.त्या प्रत्येक सण-उत्सवाचा विज्ञानाशी निकटचा संबंध आहे. याविषयी लिहिताना विशेषतः हिंदू सणांचा उल्लेख करावा लागेल.आज गुढीपाडवा!

गुढीपाडव्याशी काही धार्मिक कथा आणि परंपरा संबंधित आहेत.जसे की,श्रीरामांनी लंकापती रावणावर विजय मिळवून अयोध्येत आगमन करतांना अयोध्यावासियांनी त्यांचे गुढी उभारून स्वागत केले.

दुसरी कथा- महाभारताच्या आदिपर्वात आलेल्या कथेनुसार इंद्राने उपरिचर राजाला सज्जनांच्या प्रतिपाळ करणारी वेळूची एक काठी बहाल केली.तीच काठी इंद्राचा सन्मान राखण्यासाठी उपरिचर राजाने नवीन वर्षाच्या प्रारंभी जमीनीत रोवून तिच्यावर रेशमी वस्त्र, वरून ताम्रकलश ठेवून ती काठी पुष्पहारांनी शृंगारली. तिची पूजा केली.त्यानंतर दरवर्षी तिची नित्य पूजा होऊ लागली. हाच पहिला गुढीपाडवा होय. अशीही मान्यता आहे.

हिंदू नववर्ष चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रारंभ होते. या वर्षाच्या प्रारंभी दारी उंच बांबूपासून गुढी उभारली जाते. ही गुढी विजय आणि समृद्धीची प्रतिक असलेल्या गुढीलाच ब्रह्मध्वज असेही म्हटले जाते.गुढी उभारण्यासाठी वापरली जाणारी प्रत्येक वस्तू तितकीच खास आणि महत्त्वाची असते.श्रद्धा आणि भक्तीचा विचार करता गुढीला अर्पण करावयाची प्रत्येक वस्तू ही पुजनीय आहेच.तद्वतच त्यांच्यात मानवी जीवनाला आकार व संस्कार देण्याचे सामर्थ्य असून मानवी आरोग्य सुदृढ करण्याचेही कार्य त्यातून होते.यातील प्रत्येक वस्तू नेमकं काय सूचित करते हे अध्यात्म,ज्ञान व विज्ञान यांच्या मेळ घालून जाणून घेऊयात!

पाट किंवा चौरंग : सर्वप्रथम पाण्याने स्वच्छ धुतलेल्या पाटावर एक कोरे वस्त्र घातलेल्या पाट किंवा चौरंगावर वा तांदूळाने भरलेल्या मोठ्या ताम्र कलशातही गुढी उभी केली जाते.गुढी ज्या पाटावर उभी केली जाते तो पाट किंवा चौरंग हे स्थैर्याचं प्रतिक समजले जाते.

घरासमोर किंवा सार्वजनिक ठिकाणी उंच काठीला जरतारी साडी किंवा मलमली वस्त्र बांधून,त्यावर तांब्याचा कलश,कडुनिंबाच्या पर्णांची लहानशी डहाळी,साखरेचा हार (गाठी) आणि विविध फुलांनी सजवून पाटावर गुढी उभारली जाते.ही गुढी जीवनात नवीन संकल्पाची सुरुवात समजली जाते.हिंदू धर्मात प्रत्येक नवीन शुभ कार्याच्या संकल्प गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर केला जातो.

वेळूची काठी किंवा बांबू : गुढीसाठी वापरला जाणा-या बांबूचा आतील पोकळ गाभा हा नम्र मानवी मनाचे प्रतिनिधित्व करतो.म्हणून त्याला



नम्रता,शुद्धता आणि सचोटीचे प्रतीक म्हटले जाते.बांबू सरळ आणि उंच वाढतो. कितीही वादळ वारे आले तरी तो वेळप्रसंगी वाकतो आणि संकट गेल्यावर पुन्हा नव्या दमाने ताठ उभा राहतो. म्हणून गुढीसाठी यांचा वापर होत आला आहे.

जणू काही हा बांबू मानवाला संदेश देतो की, आपल्या अंगी असलेला अभिमान,गर्व,मद,क्रोध टाकून दिला तर कितीही मोठे संकट आले तरी त्यात तू वाचू शकतो.रावणाने अहंकारातून, गर्वातून संपूर्ण लंकेच्या व स्ववंशाचा सकल नाश ओढवून घेतला.याची आठवण बांबूकडे पाहिल्यावर येते.

रावण हा अहंकार,कामवासना,गर्व,राग,लोभ उन्मत्तपणा इत्यादि दुर्गुणांनी प्रबळ झालेला होता. श्रीरामांनी केवळ वानर सेनेच्या मदतीने त्याचा विनाश घडवून आणला.येथे रावण हा अन्याय,अत्याचाराचे प्रतिक असून वानरसेना ही क्षुद्र भासत असली तरी,त्यांची असलेली एकता व अन्यायाचे परिमार्जन करण्याची तिव्र इच्छाशक्ती ही मदोन्मत्त सत्तेला आव्हान देऊन तिला नष्ट करु शकते.ही शिकवण येथे मिळते. शिवाय असत्याला कितीही तिक्ष्ण धार असू द्या तरी ती सत्यापुढे बोथटच होते.विजय हा सत्य, शिवाचाच होतो. का? तर,सत्याचा रक्षणकर्ता देव असतो.हे अयोध्यापती श्रीरामाचा कृतीतून सूचित होते.

हळदी - कुंकू - अक्षता- गुढीला वाहिलं जाणारं हळदी- कुंकू हे सौभाग्याचं व अक्षय सुख,समृद्धी चे प्रतिक समजले जाते.

कलश - गुढीच्या सर्वात वरील भागावर तांब्याचा कलश असतो.हा कलश यशाचं प्रतिक होय.

तांब्याचा कलश काय सूचित करतो?

आयुर्वेदात सांगितले आहे,की,तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी हे कफ,पित्त,वात या त्रिदोषांना मारक असते.त्यामुळे किमान ८ तास तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी निर्जंतुक होते ते नियमित प्यायल्यास पोटातील कृमींचा नाश होतो आरोग्याच्या दृष्टीनेही ते अधिक उपयोगी ठरते.कफाची समस्या असलेल्यांनी या पाण्यात तुळशीची पाने टाकून प्राशन केल्यास उपयोग होतो. तांब्यामुळे शरीराच्या आतील जखमा विशेषतः पोटातील जखमा लवकर भरण्यास मदत होते. त्वचेवर अकाली सुरकुत्या निर्माण होत असल्यास,पित्त अल्सर किंवा पोटात गॅसचा विकार असल्यास,तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी प्यायल्याने पचनक्रियेचा मार्ग स्वच्छ होतो, परिणामी पोट स्वच्छ राहण्यास मदत होते.

दुसरे असे की,गुढीपाडवा विशेषतः उन्हाळ्यात असतो. उन्हाळ्यात प्रत्येक जिवाला क्षणोक्षणी पाण्याची गरज भासते.पाण्याविना जगणे अशक्यच! यासाठीच तर 'पाण्याला जीवन' म्हटले आहे.म्हणूनच गुढीपाडव्याच्या दिवशी पाणपोई घालावी,पाण्याने भरलेल्या घड्याचे दान करावे असाही संकेत रूढ आहे. निरोगी आरोग्यासाठी संतुलित आहार,योग्य व्यायाम, झेपेल एवढंच कष्ट,याचबरोबर भरपूर पाणी पिण्याचा सल्लाही दिला जातो.शारीरिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी सकाळी अनशापोटी तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी प्यायल्यास आरोग्याला त्याचा अधिक फायदा होतो.म्हणूनच गुढीवर तांब्याचा कलश ठेवला जातो.

गुढीपाडवा हा सण चैत्र प्रतिपदेपासून सुरु होतो.हा विशेषतः वसंतोत्सवाचा काळ.या वेळी रान नव्या पर्णपुष्पांनी समृद्ध असते.कडुनिंबाला आलेली कोवळी लुसलुशीत पाने, पित-पांढ-या मोत्यासारखा भासणारा,मंद सुगंधाने दरवळणारा त्याचा मोहर,आम्रमंजरी व त्याचा आड लपून कुहुकुहु प्रियाराधन करणारा कोकिळ ! रानात लालजर्द फुलांनी डौलात उभा पळस, गुलमोहर अहाहा! हे दृश्य मनाला नवचैतन्य देऊन जाते. म्हणून गुढीपाडव्याला दारी आंब्याचे तोरण बांधले जाते.ते जिव्हाळा व स्नेह,सौख्याचे प्रतिक होय.

कडुलिंब- गुढीवर कडुनिंबाची पानं देखील बांधली जातात.कडुलिंबाची पानं ही सुदृढ, सशक्त व निरोगी आरोग्याचे प्रतिक आहे. आयुर्वेदानुसार शरीराला संसर्गापासून वाचवण्यासाठी कडुलिंबाची पाने खूप प्रभावी आहेत.मुरुम,डाग,पुरळ, निस्तेज आणि कोरडी त्वचा यासारख्या त्वचेच्या अनेक समस्यांवर उपचार करण्यासाठी कडुनिंबाचा वापर केला जातो.रोज रिकाम्या पोटी १० ते १२कडुलिंबाच्या पानांचे सेवन केल्यास आतड्यांचे आरोग्य चांगले राहते.यकृत निरोगी ठेवता येते. कडुनिंबाच्या पानांमध्ये कडू आणि तुरट रस आढळतो, जो रक्तातील साखर नियंत्रित करतो. पानांमध्ये असलेले फायबर मल बाहेर टाकण्यास मदत करते आणि पोट फुगण्यापासून आराम देते. म्हणून आम्हास लहानपणी आमचे बाबा गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळी उठल्याबरोबर पाच सहा कडुनिंबाची पाने हमखास खायला द्यायचे.आजही ती प्रथा सुरु आहे.

जरीकाठाची साडी वा मलमली वस्त्र - गुढीच्या उंच काठीवर जरीकाठाची नवी कोरी साडी किंवा मलमली वस्त्र बांधले जाते.प्रत्येक वस्त्र आडव्या उभ्या धाग्यात विणले जाते.हे धागे जणू सुख- दुःख! दिवस रात्र ते एकसंध राहतात.ह्या वस्त्राप्रमाणेच सुख असो वा दुःख.आमचे हे कुटुंब या वस्त्रातील आडव्या उभ्या धाग्यांसारखे विश्वास व आपुलकीच्या नात्यांनी घट्ट बांधले गेले आहे.हे यातून सूचित होते. **(पान ४ वर)**

३१ मार्च म्हणजे आर्थिक वर्षाचा अखेरचा दिवस. त्या निमित्ताने ही विशेष कविता...

## हिशोब काय ठेवायचा, रिटर्न काय मागायचा!

अनंत काळाच्या अखंड ओघात
आपल्या अल्पशा आयुष्याचा...
हिशोब तो काय ठेवायचा
आणि रिटर्न तरी काय मागायचा !
जीवनाने भरभरून दिले.
जे नाही मिळाले त्याचा...
हिशोब तो काय ठेवायचा
आणि रिटर्न तरी काय मागायचा !
मित्रांनी अलोट प्रेम दिले
मग शत्रूंनी दिलेल्या त्रासांचा...
हिशोब तो काय ठेवायचा
आणि रिटर्न तरी काय मागायचा !
मधुर आठवणी इतक्या आहेत
मग काही कटु अनुभवांचा...
हिशोब तो काय ठेवायचा
आणि रिटर्न तरी काय मागायचा !
मिळाली कौतुकफुले कैकवेळा जनांकडून
मग बोच-या काट्यांचा...
हिशोब तो काय ठेवायचा
आणि रिटर्न तरी काय मागायचा !
उगवणारा प्रत्येक सूर्य प्रकाशमान.
मग रात्रीच्या अंधाराचा...
हिशोब तो काय ठेवायचा
आणि रिटर्न तरी काय मागायचा !
आनंदाचे दोन क्षण पुरे जगायला.
मग उदासवाण्या क्षणांचा...
हिशोब तो काय ठेवायचा
आणि रिटर्न तरी काय मागायचा !
चंद्र शीतल, आल्हाददायक.
मग त्याच्यावरील लांछनांचा...
हिशोब तो काय ठेवायचा
आणि रिटर्न तरी काय मागायचा !
नुसत्या आठवांनीही होते मन उल्हसित.
मग कुणी भेटल्याचा अन् न भेटल्याचा...
हिशोब तो काय ठेवायचा
आणि रिटर्न तरी काय मागायचा !
काही तरी चांगलं आहेच प्रत्येकामध्ये.
मग किरकोळ दोषांचा...
हिशोब तो काय ठेवायचा
आणि रिटर्न तरी काय मागायचा !
नाही ठेवला हिशोब, नाही लिखापढी
आहे 'त्याच्या'पाशी, 'चित्रगुप्ताची' चोपडी
हिशोबून सारे, त्याने ठरवायचे...
वसूल करायचे की रिटर्न द्यायचे!
नव्या आर्थिक वर्षाच्या शुभेच्छा!

-दिवाकर बुरसे
पुणे, मो. ९२८४३००१२५

## रमजान : वाईट प्रवृत्तींवर नियंत्रण मिळविण्याचा सर्वोत्तम काळ

डॉ.हर्षदीप बी.सरतापे
मो.७५०७१५३१०६

इस्लाममध्ये नैतिकतेला सर्वोच्च स्थान आहे. क्रोध, लोभ, मत्सर आणि अनियंत्रित वाणी वा चार दुर्गुणांमुळे व्यक्ती अनैतिकतेच्या मार्गावर जाऊ शकते. या प्रवृत्ती केवळ वैयक्तिक स्तरावर नाहीत, तर समाजाच्या स्थैर्यावरही परिणाम करतात. रमजान हा वा वाईट प्रवृत्तींवर नियंत्रण मिळवण्याचा सर्वोत्तम काळ आहे, कारण वाच महिन्यात संयम, शिस्त आणि आत्मशुद्धीवर भर दिला जातो.

१. क्रोधावर नियंत्रण : क्रोध एक नैसर्गिक भावना असली तरी, अनियंत्रित झाल्यास तो विवेकबुद्धी गमावण्यास, चुकीचे निर्णय घेण्यास आणि अनैतिक कृती करण्यास प्रवृत्त करतो. इस्लाममध्ये क्रोधावर संयम ठेवण्याचे अत्यंत महत्त्व आहे. जसे की कुरआनमधील अध्याय आले इमरानची १३४ वी आयत, जे राग गिळून टाकतात व दुसऱ्याचे अपराध माफ करतात असे सदाचारी लोक अल्लाहला अतिशय प्रिय आहेत. याचबरोबर सहीह अल-बुखारी या हदीस ग्रंथामध्ये ६११४ व्या हदीसचे भाष्य आहे की, खरा पहिलवान तो नाही जो कुस्तीत दुसऱ्याला हरवतो, तर खरा पहिलवान तो आहे जो रागाच्या वेळी स्वतःवर नियंत्रण ठेवतो आणि स्वतःला अनियंत्रित होऊ देत नाही. स्वयंसंयम आणि धैर्याने परिस्थितीचा शांतपणे विचार करून क्रोधावर विजय मिळवला जाऊ शकतो. अल्लाहकडे क्षमेसाठी प्रार्थना केल्याने नकारात्मक भावना दूर होतात. क्रोधावरील नियंत्रणासाठी पैगंबरांनी दिलेला उपाय पाहारीज कुणाचा राग आला असेल तेव्हा उभे असालणजे बसणे, बसले असाल तर झोपणे.

२. लोभाबर बिजय समाधान आणि संतोषाचा मार्गः लोभ हा असंतोष आणि स्वार्थाचे आहे. अधिकाधिक संपत्ती, सत्ता आर्चि मूळ मिळवण्यासाठी माणूस अनैतिक मार्गाचा प्रतिक्षा करतो. कुरआनमध्ये अध्याय अत-तकासूरच्या पहिल्या आणि दुसऱ्या आयतीत लोभाचा केला आहे आणि समाधानाला प्रोत्साहात निषेद्य आहे. (१) तुम्हा लोकांना अधिकात अधिन दिले एकदुसऱ्यापेक्षा जास्त पन प्राप्त कर अधिक आणि बेसावध करून टाकले आहे (२) इथप-ावेतो की (याच चिंतेत) तुम्ही थड्ग्यापर्यंत पोहच-ता. रमजान नैतिकतेचा स्त्रोत विशेषांक २२ दि. ७ ते १३ मार्च २०२५ क्रोध, लोभ, मत्सर आणि अनियंत्रित वाणीवर विजय सहीह अल-बुखारी या हदीस ग्रंथात सुद्धा ६०१८ क्रमांकाची हदीस स्पष्ट आहे की, जो अल्लाह आणि अंतिम



दिवसावर विश्वास ठेवतो, त्याने लोकांशी चांगले बोलावे किंवा शांत राहावे, वाणीवर संयम ठेवण्यासाठी शांत राहण्याची सवय लावून घ्यावी. विचार न करता बोलण्यापेक्षा संयम ठेवलेला केव्हाही बरा. बोलताना खोटेपणा, निंदा आणि कटू शब्द टाळून सत्य आणि सौम्य शब्द वापरले जावेत. माफ करण्याची वृत्ती ठेवली तर दुसऱ्या प्रती द्वेष वाढण्याऐवजी ऐक्य वाढते. रमजान संयमाचा सर्वोत्तम सरावः उपरोक्त दुर्गुणांवर उपाय करणे एका दिवसात शक्य नाही. त्यासाठी खुप सरावाची गरज असते. रमजानचा काळ त्यासाठी सर्वोत्तम आहे. रमजान केवळ उपवासाचा महिना नाही, तर तो आत्मसंयम, शिस्त आणि नैतिकतेचा अत्यंत महत्त्वाचा कालखंड आहे. कुरआनमध्ये अल-बकरा अध्यायातील १८३ व्या आयतीत रमजानबद्दल सांगितले आहेः हे इमानधारकांनो ! विहीत केले तुमच्यावर उपवास जसे विहित केले होते तुमच्या पूर्वीच्यांवर, जेणेकरून तुम्ही धर्मपरायण व्हाल. रमजानमध्ये संयमाचे महत्त्वः

३. मत्सरावर विजय असूयेच्या भावनेला सकारात्मकतेत बदलणेः मत्सर (असूया) दुसऱ्याच्या यशाबद्दल द्वेष निर्माण करतो, ज्यामुळे नकारात्मक स्पर्धा आणि समाजात फूट पडते. कुरआनमध्ये मत्सर निषिद्ध मानला आहे. अध्याय 'अन-निसा'ची ४ थी आयत, आणि जे काही अल्लाहने तुमच्यापैकी एखाद्याला दुसऱ्याच्या तुलनेत अधिक दिले आहे त्याची अभिलाषा धरू नका. सहीह मुस्लिम या हदीस ग्रंथात २५६३ क्रमांकाच्या हदीसचे स्पष्टीकरण आहे, एकमेकांविषयी द्वेष बाळगू नका, एकमेकांवर मत्सर करू नका आणि ऐक्याने राहा. मत्सरावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतःचा आत्मसुधार केला पाहिजे. अल्लाह सर्वांना देणारा आहे, ही भावना जपून दुसऱ्यांच्या यशासाठी प्रार्थना करून, दुसऱ्याच्या यशाचा द्वेष न करता त्यातून प्रेरणा घ्यावी. अल्लाहने दिलेल्या प्रत्येक गोष्टीबद्दल आभार मानून कृतज्ञता आणि समाधान व्यक्त करावे.

४. शब्दांची ताकद ओळखा संयमी बाणीचे महत्त्वः अनियंत्रित वाणीमुळे नातेसंबंध बिघडतात आणि समाजात तणाव निर्माण होतो. इस्लाममध्ये सौम्य आणि विचारपूर्वक बोलण्यावर भर देण्यात आला आहे. करआनची अल-बकरह अध्यायातील ८३ वी आयत म्हणते लोकांशी सौम्य भाषेत बोला. उपवासाच्या काळात संयम पाळण्याचा आदेश आहे, त्यामुळे क्रोधावर नियंत्रण होऊ शकते. रमजानमधील साधेपणा आणि गरजूंना मदत करण्याची संधी पाहता लोभावर विजय मिळवता येतो. रमजानमध्ये ऐक्य आणि बंधुत्व वाढवण्याचा हेतू आहे, त्यामुळे मत्सराची भावना देखील वाढत नाही. रमजान महिन्यात वाणीवर सुद्धा संयम असतो कारण उपवासात चुकीचे बोलण्याऐवजी सत्कर्मात गुंतण्यास सांगितले आहे. सहीह अल-बुखारी हदीस ग्रंथात १९०३ क्रमांकाची हदीस आहे, जो उपवास करताना खोटे बोलणे आणि वाईट कर्मे सोडत नाही, त्याचा केवळ उपवास करून काही उपयोग नाही. क्रोध, लोभ, मत्सर आणि अनियंत्रित वाणी या दुर्गुणांवर मात करणे ही फक्त वैयक्तिक जबाबदारी नाही, तर संपूर्ण समाजाच्या हितासाठी आवश्यक हा या वाईट सवयींवर विजय मिळवण्याचा सर्वोत्तम काळ आहे. कुरआन आणि हदीसच्या शिकवणींनुसार, संयम, समाधान, परोपकार आणि सौम्य वाणी या गोष्टी आत्मसात घडवू आपल्याला या बाईट प्रवृत्तींपासून दूर राहण्याची सबुद्धी देओ !.




## कृष्ण : मानवी संस्कृतीचे भविष्य



**गंगामाई शैक्षणिक ट्रस्टचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगांव, धुळे आणि विश्व हिंदी संघटन, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने वैश्विक कृष्ण साहित्यात संस्कृती, समाज आणि दर्शन या विषयावरचे चर्चासत्र मार्चच्या अंतिम आठवड्यात संपन्न होत आहे. संत साहित्याचे अभ्यासक-वक्ता व नगांवच्या गंगामाई ट्रस्टच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या हिंदी विभागाचे प्रा. डॉ. पंढरीनाथ पाटील या राष्ट्रीय चर्चासत्राचे मुख्य संयोजक आहेत.**

सद्यस्थितीत देशभर सध्या सांस्कृतिक-धार्मिक विचार आणि कार्यक्रमांची व्यापकता वाढल्याने संयोजकांनी कृष्ण साहित्यावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करून देशभरातील अभ्यासकांना आपले विचार मांडण्याची सोय करून दिली आहे. जगभरात कृष्ण प्रेमींची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. कृष्णाचे जीवन, त्याच्या लीला, त्याचे चरित्र, त्याने सांगितलेले गीता-तत्त्वज्ञान जनमानसात केवळ प्रियच नाही तर तो त्यांच्या श्रद्धेचा विषय आहे. कृष्णाने भगवद्गीतेच्या माध्यमातून मांडलेला कर्मवाद अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन या श्लोकातून अजरामर कालजयी असा संदेश त्याने दिलेला आहे. माणसाने कर्म करीत जावे पण कर्मफळाची अपेक्षा करू नये. जो जसे कर्म करील त्याला तस तसे फळ मिळत जाईल.

आत्म्यासंबंधी कृष्ण म्हणतो- आत्मा कधीच जन्म घेत नाही आणि कधी मरत ही नाही आत्मा तर अमर आहे. जसे जीर्ण झालेले वस्त्र आपण फेकून देतो तसे जीर्ण झालेल्या शरीराचा आत्मा त्याग करतो आणि नवीन शरीरात प्रवेश करतो. माणसाने जीवनात फक्त सत्याचा मार्ग अवलंबिला पाहिजे आणि खऱ्या मनाने भक्ती केली पाहिजे तोच खरा ईश्वर प्राप्तीचा मार्ग आहे. यासाठी मनाची शांती असणे अधिक महत्त्वाचे आहे. यासाठी त्याने धैर्य आणि संयमाचे पालन करणे आवश्यक आहे. जोपर्यंत मनुष्य स्वतःला जाणून घेत नाही तोपर्यंत त्याला खऱ्या जीवनाची प्राप्ती होणार नाही; खरी शांती प्राप्त होणार नाही. त्याने जे काही काम हाती घेतले आहे ते त्याने निष्काम पद्धतीने करणे आवश्यक आहे. यासाठी योगसाधनेच्या मार्गाची आवश्यकता असल्याचे कृष्ण प्रतिपादित करतो. ध्यान आणि योगाने मनाला नियंत्रित केले जाऊ शकते. म्हणून तर कृष्णाला योगेश्वर कृष्ण म्हटले जाते.

भारतीय धर्म आणि संस्कृतीत कृष्णाचे स्थान अजरामर आहे. भगवान विष्णूचा आठवा अवतार म्हणून त्याची महती गायली जाते. कृष्णावर अनेक प्रकारची संशोधने झाली आहेत, अजूनही ती होत आहेत; होत राहतील. कृष्ण समजून घेणं तेवढं सोपं नाही. जेवढे त्याच्या चारित्र्यात, लीलेत आपण गुंतत जातो तेवढे तेवढे तो त्याहून अधिक व्यापक असल्याचे आपल्या लक्षात येते. एखाद्या झाडाला गगनाची उंची गाठायची असेल तर त्याच्या मुळ्या तेवढ्या खोलवर पातळात रूजल्या पाहिजेत. त्या जेवढ्या खोलवर तेवढा वृक्ष उंचच्या उंच. कृष्णाचे चारित्र्य हे अशाच प्रकारचे आहे. भारतीय ऋषी-मुनींनी, विचारवंतांनी, अभ्यासकांनी त्यावर हर प्रकारचे संशोधन केलेले आहे. कित्येक भावविभोर करणाऱ्या कथा-कविता-कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. पण कृष्ण चरित्राची खोली गाठता येत नाही. त्याबद्दलचे आकर्षण, ओढ दिवसेंदिवस वाढतच जाते.

गत शतकातील विचारवंत, दार्शनिक आचार्य रजनीश उर्फ ओशोंची मते कृष्णाबद्दल क्रांतिकारी वाटतात. ओशोला असे वाटते की कृष्ण मानवी संस्कृतीचे भविष्य आहे कारण कृष्ण जीवनाच्या समग्रतेचा स्वीकार करतो, तो संपूर्णतेचे प्रतिक आहे. कृष्ण मर्यादेच्या पलीकडला असून पूर्ण स्वतंत्र आहे. जीवनाला तो उत्सवाप्रमाणे जगतो. त्याचे व्यक्तिमत्व खूपच वेगळे आणि विलोभनीय आहे. खरं तर कृष्ण भूतकाळात झालेला आहे. परंतु भविष्यकाळात त्याची आवश्यकता आहे. अजूनही तो माणसाच्या समजण्याच्या पलीकडला आहे. भविष्यात मात्र त्याला समजले जाऊ शकते. त्याचे कारण म्हणजे कृष्ण एकमेव अशी व्यक्ती आहे जी धर्माच्या परम उंचीवर आणि खोलीवर असून ही तो गंभीर नाही, उदास नाही, रडका नाही. तो एकटा हसवणारा, गाणारा, नाचणारा आहे. भूतकाळातील धर्म हा दुःखवादी होता. कृष्णाला वेगळे केले तर भूतकाळाला धर्म उदास आणि अश्रुंनी भरलेला होता. हसणारा धर्म समाप्त झाला होता आणि ईश्वराबद्दलची आजची धारणा ही मेल्यासारखी होती.

ओशोंनी येशू ख्रिस्ताचा दाखला देत म्हटले आहे की जिझस कधीही हसला नाही. कदाचित जिझसचे हे उदास व्यक्तिमत्व आणि सुळावर बांधलेले त्याचे शरीर आमच्यासारख्या दुःखी असणाऱ्या लोकांच्या आकर्षणाचे कारण बनते. परंतु भगवान महावीर आणि भगवान बुद्ध या जीवनाच्या विरोधी होते. त्यांच्या मते असे कुठलेच जीवन नाही, परलोक नाही, कुणाला मोक्षही नाही. या सर्वांनी जीवनाचे दोन हिस्से करून ठेवले आहेत. एक म्हणजे जीवन जे स्वीकारण्या योग्य आहे दुसरे म्हणजे ते जीवन जे स्वीकारले जाऊ शकत नाही.

सुप्रसिद्ध पाश्चात तत्त्वचिंतक अल्बर्ट श्वाइटज़र ने धर्माची आलोचना करताना म्हटले आहे की, भारताचा धर्म जीवन निषेधक आहे; लाईफ निगेटिव्ह आहे. कृष्णाला जर आपण थोडा काळ विसरलो तर त्याचे हे विधान खरेही वाटते परंतु कृष्णाचा विचार येताच ते एकदम चुकीचे वाटते. कृष्णाला तो खऱ्या अर्थाने समजू शकला नाही. कृष्ण तर एक द्वीप आहे जो एकटा दुःखाच्या महासागरावर नाचतो आहे. किंबहुना आम्ही हे समजून घेतले पाहिजे की कृष्ण म्हणजे उदास, निषेध, शोषण आणि निंदेच्या वाळवंटातील एक छोटेसे मृगजळ आहे; त्याने आपल्या शरीराचा संपूर्ण समग्रतेत स्वीकार केला आहे. कृष्णच एक असा व्यक्ती आहे जो जन्म घेताना हसत होता. बाकी सर्वजण जन्म घेताना रडतात याला अपवाद फक्त जरदृष्टाचा आहे. कृष्णाचं हे हसणं या गोष्टीचं सुचक आहे की अजून हसणारी मानवता जन्माला आलेली नाही पण कृष्णाने तर हसणाऱ्या मानवतेचाच स्वीकार केलेला आहे. म्हणूनच तर कृष्ण मानवी संस्कृतीचे भविष्य आहे. सिगमंड फ्रायड पूर्वी धर्माची जी दुनिया होती ती फ्रायड नंतर होऊ शकत नाही. एक मोठी क्रांती होऊन गेलेली आहे, **(पान ४ वर)**

# एक भासन असं भी

## ऐका ते खरं



नितीन अहिरराव
मो.९०९६२०४८७५

रामराम हो मंडई रामराम , काही दिवस पहिले एक कविसंमेलन आवतान ऊन व्हत म्हनीस्नी मी त्यामा भाग लेवाले गयथु. सकायपासुन बठ्ठा कार्यक्रमन नियोजन करेल व्हतं, ग्रंथ दिंडी , उद्घाटन समारंभ, द्विप प्रज्वलन , पुस्तक प्रकाशन या बठ्ठा कार्यक्रम मस्त आनी उत्साहमा पार पडनात . आमदार साहेबस्न भासन मस्त व्हयनं .या बठ्ठा कार्यक्रम पार पडता पडता जेवाना टाईम व्हयना आनी



संमेलनन पहिल सत्र संपन्न व्हयनं . बठ्ठा येल कवी जेवन कराले बसनात , बेत भी कान्हदेशी व्हता , पुरनणी पोयी ,खीर , भज्या कुल्हाया, तर्रीनी आमटी असा मस्त बेत व्हता. बठ्ठास्नं जेवन व्हयनं आनी कविसंमेलनना दुसरा सत्रले सुरुवात व्हयनी .

दुसरा सत्रामा परिसंवादन आयोजन करेल व्हतं .तीन प्रमुख पाहुना व्यासपीठवर बसेल व्हतात . निवोदन करना-या ताईनी पहिला पाहुनाले आपला ईचार व्यक्त कराले सांग नाही त्या पाहुना बोलाले लागनात. त्यास्नी घरतुन चार पाच पाने लिखीस्नी आनेल व्हतात त्या त्यास्नी वाची देखाडात पहिलं पाहुनानं भासनं पार पडनं आनी दुसरा पाहुना माईकवर बोलाले लागनात . दहा मिनिट व्हयनात , वीस मिनिट व्हयनात , पवुन तास व्हयना . त्या पाहुनात भासन काही संपता संपेना , त्यास्नी घरतुन जवयपास वीस पंचवीस पानेस्न भासन लिखीस्नी आनेल व्हतं , एक पान व्हयनं का दुसरं , दुसर पान वाचीस्नी व्हयनं का तिसरं , चौथं . त्यास्नी जो लामेन लाई की ऐकनारा बठ्ठा कटायी गयात . समोर बठेल श्रोता आपसमा कुजबुज कराले लागनात आनी वाट देखाले लागनात की यास्न भासन कवय पुरं व्हयी असं.

समोर बसेल श्रोतास्नी बयजबरी टाया वाजाले सुरुवात करी , पन बोलनारा पाहुना काही थांबानं नाव लेत नव्हता . पाच मिनिटमा परत श्रोत्यांनी टाया वाजाडाले सुरुवात करी . तीन चारदा टाया वाजाडी गयात पन तो बोलनारा पाहुना काही थांबेना आनी माईक हातमातुन सोडेना. बहुतेक त्या पाहुनाना असा गैरसमज व्हयेल व्हता की आपलं भासन लोकेस्ले भु आवडी राहिनं म्हनीस्नी लोके घडी घडी टाया वाजीस्नी आपुनले प्रोत्साहन दि राहिनात अस ,व्यासपीठवर बसेल एक पाहुनानी बोलनारा पाहुनाले फोन करा , पन त्या बोलनारा पाहुनानी तो फोन कट करा . असा तीन कॉल कट करता पन तो बोलनारा पाहुना काही थांबना नाव लेत नव्हता . एक पाहुनानी चिठ्ठी लिखीस्नी बोलनारा पाहुनाले धाडी की आते आवरी ल्या

पन बोलनारा पाहुनाले काहीच फरक पडना नै . आनी त्यास्नी आपलं बारीक चटक दयनं दयान काम सुरुच ठेवं .

त्या बोलनारा पाहुनाले बठ्ठा श्रोता हासाले लागनात पन त्याना भी काहीच फरक पडना नै. बठेल श्रोता पार उबगी गयात नाही परत एकसाव टाया वाजाडाले सुरुवात करी.शेवटी निवेदन करना-या ताईनी दुसरा माईक हातमा लिधा आनी त्या बोलाले लागन्यात तवय कुठे त्या प्रमुख पाहुनानं भासन संपन्न व्हयन. तिसरा पाहुनानी हायी बठ्ठी फजिती देखी आनी त्यास्नी आपलं भासन दहा मिनिटमा आवरतं लिधं आनी तो परिसंवाद थांबना, भासन थांबताच सभागृहामा नवीन चैतन्य निर्मान व्हयनं आनी पुढला काव्य संमेलनाना कार्यक्रम सुरु व्हयना. मंडई परिसंवादमा किंवा वादविवाद स्पर्धेमा बोलानी एक पध्दत -हास , आपला मुद्दा थोडकामा आनी मुद्देसूद मांडना पडतस , देल इसयना अभ्यास करिस्नी आपला शबदेस्मा तो ईसय तोंडी मांडना पडस , काही मुद्दा लिखाले हरकत नै पन पाने ना पाने लोकेस्ले वाची देखाडनं म्हनजे श्रोतास्नी परिक्षा लेवान सारखच व्हई जास . वक्ताले

जर ईसयन ज्ञान राहिनं आनी त्यानी चांगला अभ्यास करेल व्हई तर तो व्यक्ता सभागृह जिकु शकस ,महाराष्ट्रमा बराच नावजेल वक्ता शेतस त्यास्न भासन ऐकाले लोक तिकीट काढीस्नी जातस आनी त्यास्ना ईचार ऐकतस असा वक्तास्ना भासने म्हनजे श्रोतास्ले एक बौद्धिक मेजवानीच

ऱ्हास आनी श्रोता ते ऐकीस्नी तृप्त व्हतस आनी त्यास्नी बौद्धिक भुक भागस.

भासन एक कला शे , ती कला सराव करीस्नी आपुनले साध्य करता येस , कोनी काय बोलानं कितलं बोलानं याना काही नियम नै शेतस पन व्यक्तानं कौशल्य आनी बोलानी पध्दत यावर यश अपयश ठरेल -हास . टिव्हीवर सकायले दोन तीन राजकीय वक्ता बोलतस ते आपन काही वरीसपाईन ऐकी राहिनुत, या वक्ता ना फालतुक बडबड ना पाहिरे त्यास्नं कितलं नुकसान व्हयन हायी आपुन बठ्ठाच देखी राहिनुत .

आज ना आधुनिक आनी सक्रिय सोशल मिडीयाना जमानामा परिस्थितीशी विसंगत बोलनारास्ले लोके येडाना गनतीमा काढतस आनी असा वक्ता स्वतावर हासाले भाग पाडतस ,मंडई स्वातंत्र्न्या चयवयमा स्वातंत्र माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणी तो मी मिळवणाराच

तुम मुझे खुन दो मै तुम्हे आजादी दुंगा या वाक्य ऐकीस्नी तरना क्रांतिकारक सोडा धाकला पोरे आनी बायकास्न रक्त सयसय करी उठे आनी प्रत्येक जन लढाले तयार राहे . हे हिंदवी स्वराज्य व्हावे ही तर श्रींची इच्छा हाई साडेतीनशे वरीस पहिलेनी ऐतिहासिक हाक आज भी ऐकी ते आंगवर काटा येवा शिवाय राहतत नै .

शबदेस्नी ताकद खुप मोठी शे , तलवारना एक वार दोन तुकडा करस पन शबदेस्ना वार हजारो तुकडा करस . शबदे माया भी करतस आनी राग भी उत्पन्न करतस

शबदे गोडी भी करतस आनी याच शबदे फोडाफोडी भी करतस . आख्खा धरतीवर फक्त मानवजातच बोलु शकस ,आपली वानी म्हनजे देव नी देयेल एक वरदानच शे फक्त तिन्हा वापर योग्य व्होवाले पाहिजे . काही राजकीय पुढारी ते अमरधाममा भी भासन देवाले कमी करतत नै , हातमा माईक येताच बरोबर त्यास्न भासन सुरू व्हई जास . श्रध्दांजली ना दोनच शबदे नंतर मातर जो लामनं लावतस नै खर काम दादा . तो मरेल मानुस भी पस्तावा कराले लागस की मी काब्र मरनु असा .

आचार्य प्रल्हाद केशव आत्रे, आदरणीय पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे , हिंदु हृदय सम्राट बाळा साहेब ठाकरे , प्राचार्य शिवाजीराव भोसले , श्री अटल बिहारी वाजपेयी, सुषमा स्वराज या वक्तास्नी बोलानी एक खास पध्दत होती , त्यास्ना शबदेस्ले धार व्हती. स्पष्ट शब्दोच्चार, सखोल अभ्यास आनी प्रामानिक पना यामुये त्या कायम लोकेस्ना ध्यानमा राहिनात. हायी बठ्ठं सांगाना एकच उद्देश शे की जे भी कार्य रहा ते प्रामानिक पणे करा आनी आपलं वागनं ,चालनं ,बोल्नं अस ठेवा की कोनले तरास व्होवाले नै पाहिजे . चला मंडई मी आज आठेज थांबस, पुढना हप्त्याले परत भेटुत तो पावोत मन्हा बठ्ठा धनगोतले रामराम.

---

# यशाची गुढी उभारु या..!

बाबू फिलीप डिसोजा कुमठेकर
मो.९८९०५६७४६८

वेदांग ज्योतिष या ग्रंथात सांगितलेल्या साडेतीन मुहूर्तांपैकी हा एक मुहूर्त आहे. या दिवशी नवीन वस्तू खरेदी, वास्तू प्रवेश,व्यवसाय प्रारंभ, नव उपक्रमांचा प्रारंभ, सुवर्ण खरेदी इत्यादी गोष्टी केल्या जातात. दारी उभारलेली गुढी हे विजय आणि समृद्धीचे प्रतीक आहे असे मानले जाते. गुढीपाडवा साजरा करण्यामागे अनेक पौराणिक कथा (गुढीपाडवा इतिहास) सांगितल्या जातात. असं म्हणतात की, महाभारताच्या आदिपर्वात उपरिचर राजाने इंद्राने त्याला दिलेली कळकाची काठी जमिनीत रोवली आणि नवीन वर्षाच्या सुरूवाताला तिची पुजा केली. या परंपरेचा आदर राखण्यासाठी गुढी पुजन केले जाऊ लागले. इतिहासात या दिवशी ब्रम्हदेवाने विश्व निर्मिती केली असं वेदात म्हटल्याचा उल्लेख आहे.

पौराणिक कथेनुसार श्रीराम वनवासातून पुन्हा अयोध्येला परत आले म्हणून गुढीपाडवा साजरा केला जातो. म्हणूनच यशाची गुढी उभारून हा दिवस साजरा केला जातो. गुढीपाडवा का साजरा करतात यामागे अनेक कथा सांगितल्या जातात. एका कथेनुसार पार्वती आणि शंकराचे लग्न पाडव्याला ठरलं आणि तृतीयेला झालं होतं. म्हणूनच या दिवशी आदिशक्ती पार्वतीची पुजा केली जाते. गुढीपाडवा हा सण साजरा करण्यामागे पौराणिक कथेत अनेक संदर्भ सापडत असले तरी



आजही हा सण तितक्याच उत्साहात साजरा केला जातो. आजच्या आधूनिक युगातही या सणाला ऐतिहासिक सांस्कृतिक आणि नैसर्गिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. म्हणूनच पुढच्या पिढीसाठी गुढी पाडवा महत्व जाणून घेणं फार गरजेचं आहे. प्रत्येक सण साजरा करण्यामागे पुर्वजांचे काही उद्देश असतात. चैत्र महिन्यापासून वसंत ऋतूच्या आगमनाला सुरूवात होते. त्यामुळे वातावरणात बदल झालेले असतात. जुनी सुकलेली पानं गळून झाडांना नवी पालवी फुटते, आंब्याला मोहोर येतो याचं प्रतिक म्हणून गुढीला आंब्याची डहाळी बांधली जाते. पूर्वी पासून या नैसर्गिक बदलाचे स्वागत करण्याची पद्धत असावी. नवीन वर्षाच्या स्वागतामध्ये काही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. वातावरणात वाढलेल्या उन्हाची काहिली कमी करण्यासाठी गुढीमध्ये कडूलिंबाची पाने लावली जातात. प्राचीन काळापासून चैत्र शुद्ध प्रतिपदेला ओवा, मीठ, हिंग, मिरी आणि साखर हे कडुनिंबाच्या पानांबरोबर वाटून खातात. यामुळे पचनक्रिया सुधारणं, पित्ताचा नाश करणं, त्वचारोग बरं करणं, धान्यातील किड थांबवणं हे सर्व यामुळे शक्य होतं. कडुनिंबामध्ये अनेक गुण असल्यामुळे आयुर्वेदातही याला खूप महत्त्व आहे. शरीराला थंडावा देणारी कडुनिंबाची पानं आंघोळीच्या पाण्यात घालून आंघोळही केली जाते. ती वाटून खाल्ल्यामुळे आरोग्याला चांगला लाभ होतो. गुढीपाडव्याचा सण साजरा करण्यासाठी केल्या जाणाऱ्या या अशा अनेक गोष्टींना विशेष महत्त्व असतं. मात्र त्यासाठी प्रत्येकाला गुढीपाडवा माहिती माहीत असायलाच हवा.

---

# गुढीपाडवा: अध्यात्म,ज्ञान विज्ञानाचा मिलाफ!

**(पान ३ वरुन)** फुलांचा हार - फुलांचा हार मांगल्याचं प्रतिक मानला जातो.या दिवसांत वसंतोत्सव असल्याने अनेक फुले उमललेली असतात.त्या फुलांना गुंफून त्यांचा हार गुढीला घातला जातो.फुलं ही मानवाला परस्परांवर नि:स्सिम प्रेम आणि त्याग सूचित करतात.

श्रीफळ - गुढी उभारली जाते त्या पाटावर ठेवण्यात येणारा नारळ सिद्धीचं प्रतिक असतो.

सुपारी -सुपारीच्या झाडाला ' कल्पवृक्ष 'असेही म्हणतात.ती श्री-गणपतीचे प्रतिकात्मक रूप समजले जाते.हिला 'वर्षायु फळ' असेही म्हटले जाते. कारण सुपारीला तयार होण्यासाठी पूर्ण एक वर्ष लागते, याचमुळे तिन्ही ऋतु आपले संस्कार या फळाला देतात.असे म्हटले जाते कि या फळाच्या बळामुळे ही तीनही ऋतुत टिकून राहते,जे निष्ठा, प्रतिबद्धता, दृढ संबंध दर्शवते. सुपारी ही संकल्पाचे प्रतिक मानली जाते.

आयुर्वेदात असे सांगितले आहे कि सुपारीची तुरट चव कफ नाशक असते, परंतु जर अधिक प्रमाणात याचे सेवन केले गेले तर वात दोष वाढू शकतो. सुपारीत अधिक मात्रेत फाइबर असते जे कोलेस्ट्रोलला कमी करण्यात आणि कॅल्शियमला नियमित ठेवण्यात मदत करते. सुपारीचा वापर मुखशुद्धीसाठी देखील केला जातो,एक छोटा तुकडा खाल्ल्याने पाचनक्रिया सुधारते आणि अधिक लाळ कमी होते.म्हणूनच सुपारीला धार्मिक कार्यात मान दिला आहे.

साखरेचा गाठीचा हार : साखरेचा गुणधर्म म्हणजे गोडपणा! कणभर साखरेलाही मनभर मुंग्या लागलेल्या असतात.हे आपण अनेकदा पाहिलंय?असा हा साखरेपासून बनविलेला गाठीचा हार गुढीला चढवला जातो. हा हार म्हणजे आयुष्यात कोणाबद्दलही आपल्या मनात यत्किंचितही कडूपणा नसावा.बोलतांना तोंडातून नेहमी आदरयुक्त,प्रेमळ शब्द ओठी यावे.त्या शब्दांनी माणसं आपल्याकडे आकर्षित व्हावी.हे जणू साखरेचा गाठीचा हार सूचित करतो.हा हार स्नेह,सौख्य आणि जिव्हाळ्याचा प्रतिक होय.

श्रीराम हे आपले समस्त हिंदू बांधवांचे हृदयस्थ आराध्य ! त्यांनी अहंकार व वासनेने मदांध झालेल्या लंकापती रावण व अनेक असुरांचा वध करुन त्यांच्यावर विजय मिळवून अयोध्येत पदार्पण केले. तो दिवस म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदा.त्यांचा स्वागतासाठी समस्त अयोध्यावासीयांनी आपल्या घरी गुढी उभारुन त्यांचे स्वागत केले.

चैत्र शुद्ध पाडव्याच्या निमित्ताने उभारण्यात येणाऱ्या गुढीला जी काही साधने वापरुन गुढी उभारली ते प्रत्येक साधन मानवाला त्यातील विज्ञान शिकवून जाते.हे विज्ञान आपण समजून घेतले.या अध्यात्मालाच ज्ञान,विज्ञानाची जोड देऊन आपण गुढीपाडवा साजरा केला तर मला वाटते की,समाजातील असुया,अहंकार,आळस, मद,मोह, वासना,क्रोध,यातून निर्माण होणारे दैनंदिन जीवनातील कलह,दहशत, संपतील. दशदिशी सुखाचे, शांतीचे, आनंदाचे, स्नेहसौख्याचे, आपुलकीचे, विशेषतः विश्वासाचे, न्याय नीतिचे सुराज्य; नव्हे,रामराज्य नक्कीच निर्माण होईल!

## सण गुढीपाडवा आला

**चैत्र शुद्ध प्रतिपदेला**
**श्रीराम परतले अयोध्येला**
**लक्ष्मण, सीतेसह स्वयम**
**रामभक्त हनुमान आला**
**निर्दालूनी रावणलंकेस**
**विजयाचा वाजविला डंका**
**पारिपत्य अत्याचाराचे**
**दर्शवी जयपताका ना शंका**
**भयमुक्त झाले जुलूम**
**संपले अभय मिळाले सर्वां**
**वानरसेनेसवे कल्पी**
**हरण केले दशानन गर्वा**
**पाने फुले नि गुढ्या**
**तोरणे उभारूनी सजली नगरी**
**वसंत ऋतुराज देई**
**नवचैतन्याची ग्वाही अंबरी**
**नव खरेदी, नव परिधान,**
**नव मिष्टान्न, वा संकल्प**
**महाराष्ट्रात शालिवाहन**
**शक प्रारंभ पंचांग दीप**
**सोडा मनातली अढी**
**असावा कायम नात्यांत गोडवा**
**जपावी माणूसकी संस्कृती ही खरेच**
**सांगतो पाडवा**

**-बाबू फिलीप डिसोजा कुमठेकर**

---

# नारी शक्तीचा असाही एक प्रयोग

## हास्यगिरी



प्रा.वसंत गिरी
मो.९०११२२९२३२

एकदा रघूला कधी नव्हे ते विनोद करण्याची लहर आली आणि तो आपल्या प्राणप्रिय सखीला म्हणाला, थळषश या शब्दाचा माझ्या अनुभवानुसार अर्थ असा- Warries invited forever .असे म्हणून तो स्वतःच जोरजोरात हसायला लागला. हा जरी विनोद असला तरी कोणत्या बायकोला तो आवडणार? झूठी क्यों न हो,मगर तारीफ पे तारीफ और तारीफ.ऐसाही अक्सर करना पडता है और जो करता नहीं,उसे हर दिन रोना पडता है।नेमके हे वैश्विक सत्य,सत्य बोलण्यापूर्वी विसरला होता तो बिच्चारा. त्याची शिक्षा तर त्याला भोगावीच लागणारइथे चुकीला माफी नाही मिस्टर. क्योंकी उन्होंने अपने होम मिनिस्टर का दील दुखाया था।अब तो उसकी कुछ खैर नही।ओ जो बोलेगी वो सुनंने की शक्ती शायद भोले शंकरही देंगे रघू नामके नंदीको। त्यावर तात्काळ त्याची सखी म्हणाली,ओ मिस्टर, नवरा शब्दाची फोड आहे,जो कधीही वरू नये तो,न-वरा आणि कींलरपव या शब्दाचा अर्थ,जिसकी हसी बंद हो गयी है वो! तर बोला आपले हसणे कायमचे बंद करण्याचा प्रयोग केंव्हापासून सुरु करायचा.माधवीने काही प्रयोग करण्यापूर्वी बिचारा मुका झाला.ये है भाई नारी शक्ती का प्रताप !

हास्य सम्राट सुरेंद्र शर्मा या शक्तीचे महत्व विषद करतांना म्हणतात, भाई शक्ती चाहिए दुर्गामाता की पूजा करो। विद्या चाहिए सरस्वती माता की पूजा करो।आणखी बरेच नारीशक्तीचे उदा.देऊन पुढे ते म्हणतात,भाई आदमी के पास रख्खाही क्या हैआज तर अबला सबला बनविण्यासाठी पुरुष शक्तीचे होण-ारे खच्चीकरण किती आहे? त्याचे वर्णन कोणत्या शब्दात करावे? शब्दातीत आहे.समस्त नारीशक्तीची माफी मागून विनोदाच्या माध्यमातून का होईना,एक प्रखर वास्तव इथे नमूद करावेसे वाटते. एकविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मुलींची संख्या वाढली तरी संन्यास घेणाऱ्या मुलांची संख्या वाढलेली असेल.या सर्व कायद्याच्या कचाट्यात राहून संसार नावाची जन्मठेप स्विकारण्यापेक्षा भगवी वस्त्र परिधान करुन मुक्त श्वास घेण्यातच पुरुष जीवनाची सार्थकता आहे. हा विचार युवामान्य होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात आहे. वधूपक्ष वर संशोधनासाठी घराबाहेर पडताच,आपला शोध घेण्यासाठी ती मंडळी येत आहेत, हे कळताक्षणी संबंधीत युवक भूमीगत होतील.जेंव्हा त्या भूमीगताचा तपास करुन ऐनकेन प्रकारे त्यांना बोहल्यावर बसविल्या जाईल. तेंव्हा त्यांना समर्थ रामदास साक्षात्कार देतील, बाळांनो आता, जय जय रघुवीर समर्थ हा नारा द्या,तिथून उठा,लागलीच सूटा आणि परत मागे फिरुन पाहू नका.असे काही भूमीगत व्हा,त्यानंतर परत या मायाजालात तुम्हाला कोन्हीही आणू शकणार नाही. तथास्तू!असा आशीर्वाद देऊन ते अंतर्धान पावतील.. त्याक्षणी मात्र हे समस्त युवक खडबडून जागे झाले-ले असतील आणि आपला मुक्तीमार्ग त्यांना अतिशय स्पष्टपणे दिसेल.तात्काळ हर हर महादेव पेक्षाही अधिक गगनभेदी गर्जना म्हणजे, अक्षरशः प्राण कंठाशी आणून ते एकच जयघोष देतील,चलो भागो.अभी नहीं तो कभी नहीं, जयजय रघुवीर समर्थ! पुढे ते जवळच्या माणसाला शक्यतोवर दिसणारच नाहीत.सदैव दिव्य सन्यासांचा भाराऊन टाकणारा सहवास त्यांना लाभेल. काळजी,चिंता,कटकटीचे पिचून गेलेले संसारग्रस्त चेहरे दिसणार नाहीत.गोंडस,प्रसन्न,तेजपुंज चेहऱ्याचे दिव्य पुरुष सर्वत्र दृष्टीस पडतील.भारतभूमी ही खऱ्या अर्थाने दिव्य पुरुषांची खान होईल. यदा कदाचित भविष्यात त्यांची सखी त्यांना भेटली.घरी परतण्यासाठी तीने हंबरडा फोडला आणि ती कितीही याचना करु लागली,तरी हे घोर तपस्वी तिला ओळखल्याचा भावही चेहऱ्यावर येवू न देता म्हणतील,बोल बालिके तुझे क्या समस्या है!तेंव्हा ती कोमल हृदयाची सखी आणखी जोरात हंबरडा फोडेल.तो तपस्वी प्रसन्न मुद्रेने तिच्याकडे पाहून बोलेलं,शायद बहोतही गहरी चोट लगी है।ये बिटीया को,मेरे पास की ये किशनजीकी मूर्ती ले जावं,इसकी पूजा और व्रत सही ढंगसे करना. शायद आपको आपका पतीदेव मिल जाए। किंतू पूजा और व्रतमे थोडीसी भी गलती हो गयी तो तेरे पती की लाशही मिलेगी तुझे बिटीया।. Wife या शब्दाची विनोदाने फोड करणाऱ्या रघूचे डोळे या विचारानेच दिपून गेले.केवळ त्याने हे भविष्यातील भारताचे उज्वल चित्र पाहिल्यामुळे त्या दिव्य संन्यासी समूहाचा आपणही एक भाग आहोत आणि सर्व प्रापंचिक विवंचनेतून आता मुक्त झालो आहोत,असा विचार मनी बाळगून त्याला आता 'आनंदाचे डोही आनंद तरंग 'असेच क्षणभर झाले.तेवढ्यात त्याच्या मोबाईलची बेल वाजली.रघूजी खडबडून जागे झाले.अहो केंव्हापासून कॉल करते.कानात काय बोळे घालून बसलात का? जरा कुठे ठिकाणावर असत जा.हमेशा मेली तंद्री.कधीही पाहिलं तरी तंद्रीत. त्यावर रघू खुर्चितच फुटभर उडाला आणि स्वतःला सावरुन लगेच म्हणाला-बोला काय म्हणता राणी सरकार! त्यावर माधवी म्हणाली अहो आज जरा हेवी खरेदी झाली. पाच मिनिटांत घरी पोहचते.बाहेर रस्त्यावर येऊन उभे रहा. अग पण खरेदी कशी केली? हा रघूचा प्रश्न पूर्ण होण्यापूर्वीच राणी सरकारकडून उत्तर मिळाले. तुमचं क्रेडिट कार्ड होतं की मदतीला.आता मात्र रघूजीचा चेहरा खर्कन उतरला.त्याच्या चेहऱ्यावरचे बारा अगदी स्पष्ट दिसायला लागले. कसाबसा उठून बिचारा बाहेर आला.ओझेवाहू हमालाची भूमिका निट पार पाडून लांब सुस्कारा घेत त्याचा किरकोळ देह खुर्चीत स्थिरावला.कौतुकाने एकएक वस्तू दाखवायला गृहमंत्र्यांने सुरुवात केली.अर्ध्यापेक्षा अधिक वस्तू नेमक्या कशासाठी आणल्या यावर त्याचे चिंतन सुरु झाले. तसतसं त्याचा चेहऱ्याचं अक्षरशः ऊसाचं चिप्पाड होऊ लागलं.त्याच्या विचारी आणि व्यवहारी मनाला त्याचे उत्तर मिळत नव्हते.तसा तो खिन्न, उदास,निराश,हताश असे क्रमवारीने होत गेला. त्यानंतर त्याचा चेहरा व डोळे पांढरे होऊ लागले. तेवढ्यात विज कडाडावी तसे त्याचे गृहमंत्री कडाडले. काय झालं ? एवढे डोळे पांढरे करायला.माझ्या सासरच कोन्ही गचकलं की काय? एवढा मोठा बाँब पडल्यावरही या गुलामांच्या तोंडून शब्द सोडा.एक अक्षरही बाहेर पडलं नाही. एवढा कसा काय,वाचा गमावून बसला होता हा मर्द?अचानक याची सहनशिलता वाढली होती की शक्तीहीन,गर्भगळीत हे शब्दही प्रभावहीन व्हावेत तसा हा अस्तित्वहीन झाला होता ? त्या मुलूखमैदान तोफेसमोर.त्याच्या कमाईवर मनसोक्त ऐश करुन त्याच्या नशिबी सुखाचा शब्द नव्हता त्याबरोबर एकही निर्णय तो स्वतः घेवू शकत नव्हता.

रघू लग्न होण्याआधी काय खुष होता?त्यांने आपली प्राणप्रिय सखी पाहण्याअगोदर शंभर मुली पाहिल्या होत्या.हे एकशे एक क्रमांकाचं रत्न त्याच्या नजरेला पडलं.आन् हा असा काही हरखून गेला. ज्याला त्याला सांगत सुटला,बॉस शंभर मुली पाहिल्या,पण काय पिस निवडला आपण, अक्षरशः इंद्र दरबारातील रंभा,उर्वशी किस पेड की पत्ती ?अरे जीओ हजारो साल रघ्या !असे म्हणून तोंडावर हात ठेवून जोरात ओहो.. करुन हात उंच करायचा.माधवीला पाहून आल्यावर त्याने एकतर्फी ठरवून टाकलं. लग्न करील तर फक्त तिच्यासोबतच,पण वधूपक्षाकडून रघुनाथरावला काहिच प्रतिसाद मिळेना.याचे मात्र भावी सासुरवाडीत चकरावर चकरा मारुन समोरच्याला चक्रात टाकण्याचे चक्रम प्रयोग सुरू झाले.वधू पक्षानी अगदी स्पष्ट सुनावले,आमच्या मुलीला डॉक्टर,इंजिनिअर,ऑफिसर पाहून गेले.सर्वांनी तीला पसंत केले आहे.तुम्ही एक प्राथमिक शिक्षक आहात.तुम्हाला आम्ही आमची मुलगी का द्यावी? रघू आपल्या सर्व संपत्तीचा हिशोब देवू लागला.शिवाय तुमच्या सर्व अटी आपल्याला मान्य आहेत म्हणाला. फक्त बोलणीच्या वेळेस तुमच्या अटी सर्वांसमोर जाहीर करु नका,मग हा बंदा तुमच्या सेवेत अगदी सदैव हजर.त्याबद्दल मुळीच शंका नसावी.एवढीच या पामराची अट होती.वधूपक्षानं आपल्या अटी सांगायला सुरुवात केली, माधवीला तीन भाऊ व दोन बहिणी आहेत. त्यांच्या शिक्षणासाठी मदत,त्यांच्या नौकरीसाठी प्रयत्न,त्यांचे लग्न ठरविताना आपण स्वतः होऊन पुढे आलं पाहिजे.याशीवाय आमच्या कौटुंबिक जीवनात ज्या अडचणी निर्माण होतील तिथे तुम्ही सदैव तत्पर असलं पाहिजे.वारंवार तुम्हाला सांगण्याची गरज पडायला नको. एवढे वधूपक्षाकडून बोलून झाल्यातयघू नावाच्या नंदीबैलानं मान हलवली.एकदाच सावधान झालं. तेंव्हापासून माधवीने गुबूगुबूकेलं नाही तरी हा नंदीबैल सारखा मान हलवतो. त्याच्या आईवडीलाच्या कोणत्याही अडचणीकडे लक्ष द्यायची त्याला गरज वाटत नाही आणि सासुरवाडीतील कुत्रेही त्याला हक्काचा बैलं समजून त्याच्या पाठीवर चढून बसायला कमी करत नाही.त्यांची प्रत्येक गरज भागविण्यासाठी रघू वाट्टेल त्या व्याजदराने पैसे काढून सदैव तत्पर असतो.आज परिसरातील अनेक बँकाच्या नोटीस त्याला येत राहतात.कोणता सावकार कुठे आडवेल आणि या मर्दाची ऐशीतैशी करून टाकेल हे सांगता येत नाही.एकशे एक नंबरचा पिस इतका महागात पडेल? रघूनं याचा स्वप्नातही विचार केला नव्हता.काळजी आणि चिंतेने रघू चाळीसीत सत्तरीचा दिसू लागला आहे.त्याचा शेवटचा श्वास कधी संपेल हे सांगता येत नाही.माधवी मात्र आपल्या डोक्यावर कर्जाचा डोंगर करुन हा माणूस जाणारं.ही चिंता सर्वत्र बोलून दाखवते. तिचे सर्व गणगोत रघूच्याच नावाने खडे फोडतं आहे आणि तो एकविसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील दिव्य संन्याशाच्या समूहात आपला पुनर्जन्म झाला आणि आपण दिव्यानंद घेत आहोत.हे स्वप्न सदैव पाहुन रघू आपले दु:ख कमी करतोय.त्यामुळे त्याचे देणेदार, त्याला दिवाळखोर ठरवणारे त्याचे कुटुंब,नातेवाईक आणि समाज आपल्या बद्दल काय बोलतो हे त्याला कळतच नाही.

---

# कृष्ण : मानवी संस्कृतीचे भविष्य

**(पान ३ वरुन)** यामुळे मनुष्याच्या चेतनेचे मोठे विभाजन झालेले आहे. मानवाने आपल्या इच्छा-अपेक्षा-वासनांना दाबून धरले पाहिजे, दमन केले पाहिजे; त्यांचे संप्रेषण व्हायला हवे तरच आत्मा प्राप्त होईल आणि तेव्हाच परमात्मा सुद्धा उपलब्ध होईल असे प्राचीन धर्म सांगतो. फ्रायडच्या काळात एक नव्या चेतनेचा जन्म झाला आणि ती चेतना म्हणजे भावभावनांना दाबून ठेवणे चुकीचे आहे. यामुळे स्वतःच स्वतःची हिंसा करण्यासारखीही आहे. कृष्ण आणि फ्राईड नंतर जी चेतना जन्माला आली तेव्हा लक्षात आलं की कृष्णच एकटे असे आहेत की जे भावभावनांना, वासनांना दाबून धरत नाहीत. ते तर जीवनाच्या सर्व रंगांचा स्वीकार करतात, ते प्रेमापासून दूर पळत नाहीत. पुरुष असून स्त्री पासून दूर जात नाहीत; परमात्म्याचा अनुभव करीत युद्धापासून दूर जात नाही. कृष्ण स्वतः करुणा आणि प्रेमाने भरलेला असतांनाही युद्धात लढण्याचे सामर्थ्य राखतो. खरंतर त्याचं चित्त अहिंसक आहे तरीही सरळ हिंसेच्या आगीत उडी मारतो. अमृत प्राशनाची स्वीकृती असतानाही त्याला विष प्राशनाचे ही भय नाही.

कृष्ण अमर्याद आहे. कृष्णाचे केवळ चरित्र नाही तर कृष्णाच्या लीला आहेत. कृष्ण पूर्ण स्वतंत्र आहे. माणसाच्या मनाने नेहमी दोन गोष्टींपैकी एका गोष्टीची निवड केलेली आहे. त्याला वाटतं स्वर्ग योग्य आहे; त्याने स्वर्ग राखला आणि नरकाला सोडून दिले. त्याला वाटलं शांती योग्य आहे; त्याने शांतीला वाचवलं आणि तणावाला सोडून दिलं. त्याला वाटलं शुभ हे शुभ असतं; त्याने शुभ राखलं आणि अशुभाला सोडून दिलं. त्याला वाटलं प्रकाशच प्रकाश हवा; त्याने अंधाराचा त्याग केला. माणसाच्या मनाने नेहमी अस्तित्वाला दोन हिश्यात विभाजून फक्त एका हिश्याची निवड केली आणि दुसऱ्याला नाकारलं. यामुळे द्वंद निर्माण झालं; द्वैत झालं. परंतु कृष्णाने दोघांचा एकाचवेळी स्वीकार केला आणि जो दोघांचा एकाचवेळी स्वीकार करतो तोच पूर्ण असू शकतो. यासाठीच कृष्ण मानवी चेतनेच्या संपूर्णतेचे प्रतिक आहे; त्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे तरल असे प्रतिबिंब आहे!

## खान्देश वैभव



प्राचार्य डॉ.अनिल बैसाणे
मो.९८२३२७७६१२
प्राचार्य डॉ.सुभाष पाटील
मो.९४२२२१८९९९

# अस्पृश्योध्दारक : विनायक नरहर बर्वे ऊर्फ काकासाहेब बर्वे

म. गांधीजींच्या निर्देशानुसार काकासाहेब बर्वे यांनी धुळे शहर आणि परिसरात अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याला वाहून घेतले होते. त्यांच्या या अस्पृश्योद्धाराच्या कार्यात बाळूभाई मेहता, नानासाहेब ठकार, गोपाळराव मदाने, श्री.नानासाहेब शंकरराव देव, डॉ.पा.रा. घोगरे, शालिग्राम भारतीया, रामेश्वरजी पोद्दार, पू.कुंभार गुरुजी, कांतीलालभाई गुजराती, आण्णासाहेब टोणगावकर यांची मदत होती. काकासाहेबांनी 'सेवा मंडळा'ची स्थापना करून अस्पृश्य समाजात जागृती निर्माण करण्याकरिता शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, व्यसनांचे दुष्परिणाम, अंधश्रद्धाळू वृत्तीचा त्याग करणे, अस्पृश्यांसोबत भोजन घेणे असे कार्यक्रम ते राबवीत.

छत्रपती शाहू महाराज मुघल कैदेतून सुटून स्वराज्यात आले, तेव्हा त्यांना बाळाजी विश्वनाथ भट हे मुत्सद्दी येऊन मिळालेत. ते कोकणातून महाराष्ट्रात येऊन पुणे येथे स्थिरावलेत. यावेळी त्यांच्यासोबत येणार्या कुटूंबियांमध्ये बर्वे कुटुंबाचाही समावेश होता. पुढील काळात ही कुटुंबे इतर ठिकाणी स्थिरावली असावीत. विनायक नरहर ऊर्फ काकासाहेब बर्वे यांचा जन्म १२ जुलै १८८८ रोजी नाशिक जिल्ह्यातील कोठूर या गावी झाला. सावंतवाडी व नाशिक अशी त्यांची प्राथमिक ते मॅट्रिक पर्यंतच्या शिक्षणाची वाटचाल राहिली. पुढे पुणे येथे फर्ग्युसन महाविद्यालयातून बी. ए. झालेत. तर मुंबई येथून त्यांनी कायद्याची पदवी संपादन केली. वकिलीच्या व्यवसायाकरिता मात्र त्यांनी धुळे शहराची निवड केली.

**अस्पृश्यता निवारण्याचे कार्य :-**

सन १९२५ मध्ये शिरपूर येथे पश्चिम खानदेशची जिल्हास्तरीय परिषद भरविण्यात आली होती. यात शिक्षण प्रसार, खादीचा स्वीकार, मद्यपानबंदी असे समाज हिताचे ठराव मांडण्यात आले. मात्र काकासाहेब बर्वे यांनी अस्पृश्यता निवारण्याविषयीचे दोन ठराव मांडलेत. अस्पृश्यतासारखी अनिष्ट चाल बंद करावी आणि सार्वजनिक स्थळे अस्पृश्यता खुली करावीत अशी त्यांची मागणी होती. सन १९२९ च्या पुणे येथील 'पर्वती मंदिर' सत्याग्रहाप्रसंगी सदर मंदिर हे सार्वजनिक असून अस्पृश्यांना प्रवेश मिळाला पाहिजे अशी जाहीर भूमिका घेत आंबेडकरी अनुयायांना त्यांनी पाठींबा दिला होता. जन्मावर अवलंबून नसलेली अस्पृश्यता समाजाला सेवा प्रदान करणार्या लोकांवर लादण्यात आलेली आहे. म्हणून तिच्या उच्चाटनाकरिता सर्वांनीच पुढे यावे असा त्यांचा आग्रह होता.



विनायक नरहर बर्वे उर्फ काकासाहेब बर्वे

**'सेवक संघा'ची स्थापना :-**

म. गांधीजींच्या निर्देशानुसार काकासाहेब बर्वे यांनी धुळे शहर आणि परिसरात अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याला वाहून घेतले होते. त्यांच्या या अस्पृश्योद्धाराच्या कार्यात बाळूभाई मेहता, नानासाहेब ठकार, गोपाळराव मदाने, श्री. नानासाहेब शंकरराव देव, डॉ. पा. रा. घोगरे, शालिग्राम भारतीया, रामेश्वरजी पोद्दार, पू. कुंभार गुरुजी, कांतीलालभाई गुजराती, आण्णासाहेब टोणगावकर यांची मदत होती. काकासाहेबांनी 'सेवा मंडळा'ची स्थापना करून अस्पृश्य समाजात जागृती निर्माण करण्याकरिता शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, व्यसनांचे दुष्परिणाम, अंधश्रद्धाळू वृत्तीचा त्याग करणे, अस्पृश्यांसोबत भोजन घेणे असे कार्यक्रम ते राबवीत. महात्मा गांधीजींच्या प्राणांतिक उपोषणानंतर तर राष्ट्रीय स्तरावर अस्पृश्योद्धाराची चळवळच सुरू करण्यात आली होती. देशात शेठ घन:श्याम दास बिर्ला आणि ठक्कर बाप्पा यांच्या नेतृत्वात ठिकठिकाणी सेवा संघाची स्थापना करण्यात आली. धुळे जिल्ह्यात ही जबाबदारी काकासाहेब बर्वे यांच्यावर सोपविण्यात आली होती.

**अस्पृश्य मुला-मुलींकरिता वस्तीगृहे :-**

काकासाहेब बर्वे यांच्या अस्पृश्योद्धारासारख्या मुलगामी कार्याला विनोबाजींसह सर्वच सुधारकी नेत्यांनी सहकार्य दिले होते. अस्पृश्यता घालविण्याकरिता शैक्षणिक प्रसार करणे हा एकमेव उपाय होता. म्हणून देवपूरमध्ये अस्पृश्य मुलांकरिता वस्तीगृह काढण्यात आले. सन १९३५ मध्ये डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते या वस्तीगृहाची पायाभरणी करण्यात आली होती. म्हणून सदर वस्तीगृहाला राजेंद्र छात्रालय असे नाव देण्यात आले.

तसेच अस्पृश्य मुलींकरीताही सन १९३९ मध्ये कन्या छात्रालय सुरू करण्यात आले. निवास आणि भोजनाची सोय शहरी भागात झाल्यामुळे या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थांमधून प्रवेश घेता आला. यामुळे अस्पृश्य मुला-मुलींनाही ज्ञानार्जनाच्या मुख्य प्रवाहात सामील होता आले. अशीच वस्तीगृहे काकासाहेबांच्या सहकार्याने आणि प्रेरणेने जळगाव जिल्ह्यात अंमळनेर, जामनेर येथेही काढण्यात आली होती.

**'मंदिर प्रवेश' मंडळाची स्थापना :-**

अस्पृश्योद्धाराकरिता काकासाहेब जिल्हा आणि जिल्हा बाहेर सर्वत्र दौरे हाती घेऊन जाहीर सभांमधून आपली भूमिका मांडत. ग्रामीण भागात बहिष्कार टाकणार्या सवर्णांना समज देऊन समन्वयी मार्ग काढत. सुधारकी नेते आणि कार्यकर्ते यांच्या सहकार्याने काकासाहेबांनी सदर कार्य नेटाने चालविले होते. पुढे तर त्यांच्या कार्याची दखल घेत सेवक संघाच्या महाराष्ट्र प्रांत अध्यक्षपदाची जबाबदारीच त्यांच्यावर टाकण्यात आली होती. सर्वत्र गौरव प्राप्त झालेल्या काकासाहेबांनी तर अस्पृश्योद्धाराचे कार्य करणार्या पश्चिम भारतातील सहकार्यांची पुणे येथे परिषद भरवून या कार्याला प्रोत्साहन दिले.

प्रबोधनकार ठाकरेंसारख्या विचारवंतांच्या जाहीर सभांमधून सत्यशोधक, अस्पृश्यता निवारणासारख्या विषयांवरील मार्गदर्शनाचा लाभ जनतेला मिळवून देत. अशा प्रबोधन पर्वातूनच काकासाहेबांनी धुळे शहरातील श्रीराम मंदिरासह जळगाव जिल्ह्यातील एदलाबाद, भडगाव येथील मंदिरेही अस्पृश्यांकरिता खुली केली होती.

पुढील काळात तर पूर्ण वेळच अस्पृश्योध्दाराच्या कार्याला झोकून दिलेल्या काकासाहेबांनी वकिली व्यवसायाचा त्याग केला. साने गुरुजींच्या पंढरपूर मंदिर सत्याग्रह चळवळीत सक्रियपणे सहभाग घेतला. या प्रसंगी अनुकूल वातावरण निर्मिती करिता काकासाहेबांनी पुण्यात कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन 'मंदिर प्रवेश' मंडळाची स्थापना केली. आणि साने गुरुजींबरोबर राहून अस्पृश्यांना पंढरपूर मंदिर खुले केले.

**भंगी-मुक्तीचे मानवतावादी कार्य :-**

सन १९४८ मध्ये मुंबई येथील सेवक संघाच्या बैठकीत काकासाहेबांनी भंगी जातींसह सफाई कामगारांविषयीचा ठराव मंजूर करून घेतला. भंगी बांधवांवर लादण्यात आलेले काम मानवतेला लांच्छनास्पद असल्याचे सांगून त्यातून त्यांची मुक्ती झालीच पाहिजे. याकरिताही पुणे येथील बैठकीत महत्त्वाच्या सूचनांचा स्वीकार करून कार्य करण्याचे निश्चित करण्यात आले होते. या मानवतावादी कार्याची दखल घेत शासनाने भंगी-मुक्ती करिता सन १९५० मध्ये काकासाहेबांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली. या समितीने अभ्यास करून शासनाला अहवाल सादर केला. त्यात भंगी समूहाच्या जीवनमानात सुधारणा करण्याकरिता किमान वेतन व भत्ते, निवाराच्या सुविधा, शासकीय मदत, सामूहिक व वैयक्तिक अद्ययावत शौचालयांची उभारणी करणे अशा तरतुदींचा समावेश करण्यात आला होता. काकासाहेबांच्या नेतृत्वात कार्यरत असलेल्या या समितीचा अहवाल मुंबई शासनाबरोबरच देशभरात मार्गदर्शक म्हणून स्वीकारण्यात आला. त्याच्या अंमलबजावणी करिता काकासाहेब सतत प्रयत्नशील राहिलेत. भंगी समूहातील मुला-मुलींना शैक्षणिक प्रवाहात आणण्याकरिता ते कटिबद्ध राहिले.

सन १९५३ मध्ये सामाजिक परिषदेचे अधिवेशन पुणे येथे भरविण्यात आले होते. या अधिवेशनात संतती नियमन बरोबरच अस्पृश्यता निवारण आणि भंगी-मुक्ती यासंबंधीचे महत्त्वपूर्ण ठराव पास करण्यात आले होते. यात काकासाहेबांची भूमिका महत्त्वाची राहिली होती.

**मागास जन-जातींकरिता कार्य :-**

अस्पृश्यता निवारण्याबरोबरच इतर मागास जन-जातींविषयीचे काकासाहेबांचे कार्य ही मूलगामी असेच होते. आदिवासी समूहाच्या सुधारणेकरिता ठक्कर बाप्पा, नानासाहेब शंकरराव ठकार यासारखे समाजसेवक कार्यरत होते. यातूनच पश्चिम खानदेश भिल्ल मंडळाची स्थापना करण्यात आली होती. या कार्यातही अग्रणी असलेल्या काकासाहेबांनी या मंडळाच्या उपाध्यक्षपदाची धुरा सांभाळून सेवाभाव जपला. आदिवासी भागात जाऊन त्यांच्या समस्या समजावून घेत.

हिंदू धर्माने वन्य जातींची उपेक्षा केली मात्र ख्रिस्ती धर्माने त्यांना आपलेसे करून सेवा प्रदान केली. शिक्षण आणि आरोग्य सुविधा प्रदान करून त्यांच्या कल्याणकारी जीवनाकरिता मिशनऱ्यांनी कष्ट उपसले. द्वेष भावना टाकून या वन्य व बहिष्कृत जाती समूहांविषयी सेवाभाव स्वीकारण्याचे आवाहन काकासाहेब हिंदू धर्मियांना करीत होते. भेदभाव करीत मागासवर्गाची उपेक्षा न करता त्यांना आपलेसे करावे अशी मानवतावादी शिकवण काकासाहेब देत. मानवी जगताचे कल्याण साधण्याकरिता ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र न राहता माणूस म्हणून वाटचाल केली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

**'दलित सेवक' वृत्तपत्रातून लोकजागृती :-**

आपले विचार आणि कार्य सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचावे याकरिता महत्त्वाचे साधन म्हणून काकासाहेबांनी सन १९४१ मध्ये 'दलित सेवक' हे वृत्तपत्र चालविले होते. या वृत्तपत्राची नियतकालिक, मासिक आणि पाक्षिक अशी प्रभावी वाटचाल राहिली. म. गांधीजींचे विचार, तत्त्वज्ञान, कार्य यांचा आदर्श त्यांच्या समोर उभा होता. म्हणूनच अतिशय शांततापूर्वक मार्गाने अस्पृश्यांच्या व्यथा समाजासमोर मांडून सवर्णांच्या हृदयपरिवर्तनातून न्याय प्रदान करता येईल. याकरिता त्यांनी आपले विचार 'दलित सेवक' मधून मांडलेत. अस्पृश्यांमध्ये आत्मभान निर्माण होण्याबरोबरच सवर्णांमध्ये समानतेची जाण निर्माण व्हावी ही काकासाहेबांची भूमिका होती. याकरिता त्यांनी हिंदू धर्मातील अमानवीय रूढी-परंपरा, रितीरीवाज टाकून सुधारण्याचे व्रत स्वीकारावे असेही आव्हान केले. अस्पृश्यतासारख्या भेद-भाव करणार्या रूढी-परंपरा टाकून मानवतावादाचा स्वीकार करावा असा 'आचार धर्म'चा ते आग्रह करीत. धार्मिक द्वेष बाळगून धर्मांधपणे वाटचाल करणे हा माणूस धर्म नसतो. अस्पृश्यतेचे उच्चाटन हाच खरा धर्म असल्याचे त्यांचे मत होते. म्हणूनच मानवतेच्या निसर्गदत्त हक्कांच्या प्राप्ती करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या धम्म स्वीकारण्याच्या निर्णयाचे ते स्वागतच करीत. जातीव्यवस्थेची समाजशास्त्रीय चिकित्सा करून समतेची रुजवन कशी करता येईल याविषयीचे मुलगामी लिखाण त्यांनी केले. लोकशाही दृढ होऊन वृध्दींगत करायची असेल तर सामाजिक समतेची नितांत आवश्यकता आहे असा त्यांचा आग्रहच होता.

**काकासाहेबांच्या कार्याचा गौरव :-**

सन १९४८ मध्ये धुळे येथे अस्पृश्य लोकांच्या आयोजित विशेष मेळाव्यात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शुभहस्ते काकासाहेबांचा यथोचित गौरव करण्यात आला. याप्रसंगी पूज्य साने गुरुजी, श्री. शंकरराव देव, अण्णासाहेब दास्ताने, ठक्कर बाप्पा, डॉ. अष्टपुत्रे, संत तुकडोजी महाराज, तात्यासाहेब भा. वा. भट, दादासाहेब डॉ. पा. रा. घोगरे, बाळूभाई मेहता, नानासाहेब ठकार अशा मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. महाराष्ट्रातून अस्पृश्य समाजातील कार्यकर्त्यांचाही मोठा सहभाग होता. याप्रसंगी काकासाहेबांनी सांगितले की, परमेश्वरासमोर सर्व सारखेच असतात, मग आपण भेदभाव का करीत असतो. म्हणून आपण आपल्या धार्मिक क्षेत्रात परिवर्तनीय बनून अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली होती. अस्पृश्य आणि सवर्ण असे वाद निर्माण झाले म्हणजे काकासाहेब तिथे जात व अन्यायग्रस्त अस्पृश्यांना न्याय मिळवून देत.

काकासाहेबांचा देव हा संत तुकाराम महाराजांप्रमाणे रंजल्या-गांजलेल्या माणसात होता. म्हणूनच त्यांनी अखंड मानवी सेवेचे व्रत स्वीकारले होते. अस्पृश्य, मागास समूहांच्या मुक्तीकरिता झटणारे काकासाहेब सन १९५४ च्या मार्चमध्ये परलोकीच्या यात्रेवर निघून गेले.

अशा मानवतावादी कार्याचा वसा ठेवून गेलेल्या विनायक नरहर उर्फ काकासाहेब बर्वे यांना विनम्र आदरांजली !

## सुजाण पालक



डॉ.अभिनय दरवडे
मो.७५८८१०४००७

# समुपदेशनाची खरी गरज पालकांनाच..!

कोड्यात पडलेले जरासे गोंधळलेले पालक, आणि आपल्या मुद्द्यांवर अतिशय ठाम असलेली मुलगी! पालकांचं एकच चाललेलं! वेडी वाकडी वाट कशाला निवडायची! इंजिनिअरिंग मिळतं आहे ते पण पुण्याच्या कॉलेज मध्ये मग कशाला हे नसते उद्योग हवेत! मुलगी मात्र न चिडता समजावून सांगत होती! इंजिनिअरिंग मध्ये सुद्धा सॅचुरेशन आलं आहे, हजारो इंजिनिअर्स घरात बसू आहेत, मला ज्यात रस नबी ते मी का करू? त्यापेक्षा ज्यात मला आवड आहे त्या क्षेत्राबद्दल मी पूर्ण अभ्यास करून माहिती काढली आहे तर एकदा माझ्यावर विश्वास तर ठेवून बघा! खरं तर समुपदेशनाची गरज मुलीपेक्षा तिच्या पालकांना जास्त होती!



मुलांच्या करिअरच्या वाटा निवडताना पालकांनी काही गोष्टी लक्षात घ्यायला हव्या! आजच्या गतिमान युगात मुलांच्या करिअरची निवड हा एक महत्त्वाचा आणि जबाबदारीचा निर्णय ठरतो. पूर्वी डॉक्टर, इंजिनिअर, वकील यांसारख्या ठराविक क्षेत्रांमध्ये करिअर करण्याकडे पालकांचा कल असायचा. मात्र, बदलत्या काळानुसार विविध नवीन क्षेत्र उदयास आली आहेत. त्यामुळे मुलांना त्यांच्या आवडी-निवडी आणि कौशल्यांनुसार योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

१. मुलांची स्वाभाविक आवड आणि क्षमता ओळखा. प्रत्येक मूल वेगळ्या क्षमता आणि गुणधर्म घेऊन जन्माला येते. काहींना गणिताची आवड असते, तर काहींना संगीत, क्रीडा किंवा कला यामध्ये रुची असते. पालकांनी मुलांना विविध गोष्टी करून पाहण्याची संधी द्यावी, जेणेकरून त्यांना त्यांची खरी आवड समजेल.

काय करावे?

मुलांचे निरीक्षण करा - त्यांना कोणत्या विषयांमध्ये जास्त रस आहे? त्यांना लहान वयातच विविध उपक्रमांमध्ये सहभागी करून घ्या. त्यांच्या आवडीनुसार त्यांना योग्य संधी उपलब्ध करून द्या.

२. करिअर निवडताना भविष्यातील संधी विचारात घ्या. बाजारात कोणत्या क्षेत्रांना चांगली मागणी आहे, हे पालकांनी पाहणे गरजेचे आहे. तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, पर्यावरणशास्त्र, डिजिटल मार्केटिंग, गेम डेव्हलपमेंट यांसारख्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होत आहेत.

काय करावे?सध्याच्या आणि भविष्यातील रोजगाराच्या संधींवर संशोधन करा. मुलांना त्या क्षेत्रांतील तज्ज्ञांशी बोलण्याची संधी द्या. कौशल्याधारित शिक्षणावर भर द्या.

३. पालकांनी करिअर निवडण्याचा हट्ट करू नये. पालकांनी त्यांच्या अपेक्षांच्या आधारे मुलांवर करिअर निवडण्याचा दबाव टाकू नये. काही वेळा पालक आपली स्वप्ने मुलांच्या माध्यमातून पूर्ण करू पाहतात, पण त्यामुळे मुलांवर मानसिक तणाव वाढतो.

काय करावे?

मुलांशी संवाद साधा आणि त्यांचे मत जाणून घ्या. करिअर निवडण्यास भाग पाडण्याऐवजी त्यांना मार्गदर्शन करा. स्वप्न मोठी ठेवण्यासाठी त्यांना प्रेरित करा, पण ते त्यांच्या आवडीनुसार असू द्या.

४. शिक्षणासोबत कौशल्यविकास महत्त्वाचा. सध्याच्या युगात केवळ शैक्षणिक गुणवत्ता पुरेशी नाही, तर अतिरिक्त कौशल्ये असणे गरजेचे आहे. सॉफ्ट स्किल्स (संवाद कौशल्य, टीमवर्क, लीडरशिप), तांत्रिक कौशल्ये (कोडिंग, डेटा ॲनॅलिटिक्स), आणि सृजनशीलता (लेखन, डिझाइन, छायाचित्रण) ही कौशल्ये भविष्याला दिशा देऊ शकतात.

काय करावे?

मुलांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन द्या. त्यांना डिजिटल आणि तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून द्या. त्यांचे व्यक्तिमत्त्व विकास करण्यासाठी समुपदेशन घ्या.

५. करिअर मार्गदर्शन आणि समुपदेशन घ्या. कधी कधी योग्य मार्गदर्शन उपलब्ध नसल्याने मुलांची गोंधळ उडते. त्यामुळे व्यावसायिक करिअर मार्गदर्शकांची मदत घेणे फायद्याचे ठरते.

काय करावे?

शाळा-कॉलेजमधील करिअर मार्गदर्शन शिबिरांचा लाभ घ्या. सायकोमेट्रिक टेस्टद्वारे मुलांची क्षमता आणि स्वभाव जाणून घ्या. अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन घ्या.

६. मुलांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष द्या. करिअर निवडीच्या प्रक्रियेत मुलांवर मानसिक दबाव टाकला गेला तर त्याचा परिणाम त्यांच्या मानसिक आरोग्यावर होतो. मुलांना सतत स्पर्धेच्या तणावाखाली न ठेवता त्यांना आनंदी वातावरण द्यावे.

काय करावे?

त्यांच्याशी नियमित संवाद साधा आणि त्यांच्या समस्या समजून घ्या. अभ्यास आणि करिअर यासोबतच मैदानी खेळ, छंद आणि मनोरंजनालाही महत्त्व द्या. त्यांच्यावर अनावश्यक अपेक्षांचा भार टाकू नका.

निष्कर्ष: मुलांचे करिअर घडवताना पालकांनी त्यांचा कल, क्षमता आणि भविष्यातील संधी लक्षात घेऊन योग्य दिशा द्यावी. योग्य मार्गदर्शन आणि सकारात्मक वातावरण दिल्यास मुलं आत्मविश्वासाने आणि आनंदाने आपले करिअर निवडू शकतात. त्यांच्या निर्णयाचा आदर करून, त्यांना पुढे जाण्यास प्रोत्साहन देणे हाच त्यांच्या यशाचा खरा मार्ग ठरतो.

## राशी भविष्य






सुमेध रानडे, पुणे
मो.९५६१०९३७४०




३० मार्च ते ५ एप्रिल




या आठवड्यात सर्वच राशींना पिवळा सिग्नल, वाटचाल जपून करा! त्यातल्या त्यात वृषभ तूळ मकर या राशींना बरी फळे ; कर्क कन्या वृश्चिक कुंभ या राशींना मध्यम फळे ; पण मेष मिथुन सिंह धनू आणि मीन या राशींची सगळ्यात जास्त काळजी घेणे गरजेचे!

**मेष:** सुरुवात - आठवड्याच्या सुरुवातीला होऊन गेलेले ग्रहण घरात कटकटीचे वातावरण देऊ शकते. किरकोळ आजारपण उद्भवू शकते. पोटाचे त्रास, डोकेदुखी डोकं वर काढू शकतात. मध्य - आठवड्याच्या मध्यात कुटुंबात एखादे वाहन घेतले जाऊ शकते. जमिनीसंबंधी किंवा घरसंबंधी व्यवहार होतील. आईबरोबर संबंध सुधारतील. तुमचे नावलौकिक वाढण्याची शक्यता आहे. शेवट - आठवड्याच्या शेवटी जवळ कुठल्यातरी सहलीला जाण्याचा योग येईल. बहिणी भावा संबंधी एखादी जबाबदारी घ्यावी लागू शकते. हात, खांदा, मान यांना जपण्याची गरज!

**वृषभ:** सुरुवात - आठवड्याच्या सुरुवातीला मित्र मैत्रिणी किंवा ओळखीच्या लोकांबरोबर प्रवास योग संभवतो. पैसे सांभाळण्याची गरज आहे, फसवणूक होऊ शकते. मध्य - आठवड्याच्या मध्यात तुम्हाला कामात संधी मिळणार आहे. पण त्यातून हवं तसं निष्पन्न निघणार नाही, त्यामुळे फार अपेक्षा ठेवू नका. अचानक एखाद्या गोष्टीने सुख आणि अचानक दुःख दोन्ही पाठोपाठ मिळेल. शेवट - आठवड्याच्या शेवटी जोडीदाराशी किरकोळ भांडणं आणि मतभेद होण्याची शक्यता आणि त्यातून मानसिक अस्वस्थता वाटू शकते.

**मिथुन:** सुरुवात - आठवड्याच्या सुरुवातीला होऊन गेलेले ग्रहण आणि वक्री राशीस्वामी नावलौकिक किंवा माणसानमाला एखादा धक्का देऊ शकतात. पितृचिंता, भावंडांची चिंता उद्भवू शकते. आरोग्याची देखील काळजी घेणे गरजेचे. मध्य - आठवड्याच्या मध्यात जोडीदार आणि जबाबदाऱ्या यांनी तुमची ओढाताण होणार आहे. पैसे वेळ आणि कष्ट खर्च करण्याची तयारी ठेवा. मानसिक स्वास्थ्य सांभाळा. शेवट - आठवड्याच्या शेवटी स्वार्थी प्रवृत्तीमुळे तुमचे नुकसान होण्याची शक्यता आहे म्हणून मोठा विचार करा. इतरांनाही किंमत द्या त्यांचा विचार करा.

**कर्क:** सुरुवात - आठवड्याच्या सुरुवातीला बुद्धी, विद्या, कला कौशल्य, यात एखादी चांगली घटना घडण्याची शक्यता आहे. प्रकृती सुधारेल, अडथळे दूर करण्याचे बळ मिळेल! मध्य - आठवड्याच्या मध्यात राग लोभ यांमुळे त्रास होण्याची शक्यता आहे. धार्मिक कार्यक्रम, प्रवास आणि उपासनेतून आनंद मिळेल. अध्यात्मिक उन्नती साठी अनुकूल काळ आहे! शेवट - आठवड्याच्या शेवटी नोकरी व्यवसायात बाहेरगावी जावं लागू शकतं. किंवा दूरवर जाऊन एखादं काम करावं लागू शकतं. संतती संबंधी आनंददायी घटना घडू शकते.

**सिंह:** सुरुवात - आठवड्याच्या सुरुवातीला होऊन गेलेले ग्रहण मानसिक दृष्ट्या परिणाम करणारे ठरेल. आरोग्याची आणि संतती संबंधी समस्या येऊ शकते. कुटुंबात अचानक एखादा लाभ होऊ शकतो. मध्य - आठवड्याच्या मध्यात संतती संबंधी त्रास होऊ शकतात. प्रेमात फसवणूक होऊ शकते. पहिल्या भेटीत कोणतेही निर्णय घेऊ नका. सासुरवाडीला काही त्रास होण्याची शक्यता आहे. शेवट - आठवड्याच्या शेवटी घराबाहेर कुठेतरी फिरायला जाण्यातून चांगले अनुभव येतील. धार्मिक स्थळी किंवा धार्मिक कार्यक्रमात सहभाग होऊ शकतो.

**कन्या:** सुरुवात - आठवड्याच्या सुरुवातीला होऊन गेलेले ग्रहण आणि वक्री राशीस्वामी यांच्यामुळे मोठी उलाढाल होण्याची शक्यता आहे. व्यवसायात नुकसान होऊ शकते. भागीदार असतील तर त्यांच्यापासून सावध राहिलेले चांगले! मध्य - आठवड्याच्या मध्यात आई आणि जोडीदार यांच्यामुळे तुम्हाला दिलासा मिळणार आहे. या दोन्हींत सलोखा होण्याची शकता आहे. जवळच्या व्यक्तींबरोबर तीर्थयात्रेला जाण्याचा संभव आहे. शेवट - आठवड्याच्या शेवटी मित्र मैत्रिणी ओळखीचे लोक यांच्यामुळे फसले जाण्याची शक्यता आहे त्यामुळे त्यांच्या म्हणण्यात न आलेले चांगले.

**तूळ:** सुरुवात - आठवड्याच्या सुरुवातीला भांडणतंटा आणि वादविवाद तुमची ऊर्जा कमी करतील. कफ विकार होण्याची शक्यता आहे. नोकरीत कष्ट करावे लागतील. मध्य - आठवड्याच्या मध्यात भावंडांशी कडाक्याचे भांडण किंवा मतभेद होण्याची शक्यता आहे. नोकरीत व्यवसायात फसवणूक होऊ शकते. सामाजिक काम करताना शांतपणे करा लोकांचा रोष ओढवून घेऊ नका. शेवट - आठवड्याच्या शेवटी जोडीदाराचा उत्कर्ष त्याच्या नोकरीच्या ठिकाणी होण्याची शक्यता आहे. लोकांपर्यंत तुमची कीर्ती पोचेल, लोकसंग्रह वाढेल!

**वृश्चिक:** सुरुवात - आठवड्याच्या सुरुवातीला संततीची प्रेम प्रकरणात यश येण्याची शक्यता आहे. शिक्षण परीक्षा यात प्रगती होईल. प्रवासाची शक्यता आहे. धार्मिक वृत्ती वाढेल! मध्य - आठवड्याच्या मध्यात जोडीदारा संबंधी अनुकूल घटना घडण्याचा संभव आहे. मान सन्मान वाढेल. बुद्धी, विद्या, हुशारी यांच्या जोरावर तुम्ही लोकांत उठून दिसण्याची शक्यता आहे. शेवट - आठवड्याच्या शेवटी एखादे रखडत पूर्ण होण्याची शक्यता आहे. आरोग्याची किरकोळ समस्या निर्माण होऊ शकते, त्यामुळे कुपथ्य नको.

**धनू:** सुरुवात - आठवड्याच्या सुरुवातीला होऊन गेलेले ग्रहण तुम्हाला प्रिय व्यक्तींसोबत मतभेद देऊन जाईल. वाहन घर जमीन या संबंधी व्यवहार करताना सावध रहा. झोप लागायला त्रास होऊ शकतो. मध्य - आठवड्याच्या मध्यात मातृचिंता सतावू शकते. तुमची स्वतःची मानसिक अवस्था देखील चंचल राहील. या सगळ्यामुळे तब्येतीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. काळजी घ्या. शेवट - आठवड्याच्या शेवटी संतती संबंधी जास्त काळजी घ्या. मुलांकडे लक्ष ठेवा. प्रेमात अती उत्साह किंवा पराक्रम दाखवायला जाऊ नका!

**मकर:** सुरुवात - आठवड्याच्या सुरुवातीला लहान मोठे प्रवास घडण्याची शक्यता आहे. कला क्रीडा या क्षेत्रात प्रगती होईल. भावंडात समस्या होतील. तुमचा आत्मविश्वास वाढेल! मध्य - आठवड्याच्या मध्यात वैवाहिक पातळीवर संघर्षमय वातावरण राहील. बोलण्यात यश येईल. पण समाजात फार पुढे पुढे करुन संकट ओढवून घेऊ नका. शेवट - आठवड्याच्या शेवटी घरातील प्रिय व्यक्तींसोबत आनंदी वेळ घालवता येणार आहे. कुठलेही वादाचे प्रसंग टाळा आणि सबुरीने परिस्थिती सांभाळा.

**कुंभ:** सुरुवात - आठवड्याच्या सुरुवातीला होऊन गेलेले ग्रहण तुमच्यावर कौटुंबिक कटकटी लादणार आहे. तयार रहा, घरात पै पाहुणे, बाहेरच्या व्यक्ती भांडणं लावू शकतात. पैशाचे व्यवहार टाळा. मध्य - आठवड्याच्या मध्यात एखादा धनलाभ होण्याची शक्यता आहे. मामा मावशी संबंधी घटना घडतील. आर्थिक बाबतीत अनुकूल वातावरण होईल. शेवट - आठवड्याच्या शेवटी भावंडांची चांगली प्रगती, हव्या त्या कार्यात त्यांना यश येण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी तुम्हाला चांगली संधी मिळेल!

**मीन:** सुरुवात - आठवड्याच्या सुरुवातीला राशीत होऊन गेलेले ग्रहण आणि वक्री बुधामुळे हा सप्ताह देखील त्रासदायक जाऊ शकतो. प्रेमात यश येईल, संतती संबंधी चिंता दूर होईल. जोडीदाराला जपण्याची गरज आहे! मध्य - आठवड्याच्या मध्यात कला क्रीडा लेखन इत्यादी क्षेत्रात प्रगती होईल. लहान प्रवासाचा योग येईल. दूर गेलेली भावंडं जवळ येईल. तुटलेला संपर्क जुळेल. शेवट - आठवड्याच्या शेवटी परिस्थितीत चांगला सुधार होणार आहे. घरात आनंदी घटना घडेल. आर्थिक किंवा कौटुंबिक लाभ होण्याची शक्यता आहे. प्रकृती सुधारेल!

**शौर्योद्गारांचा इतिहास**

अर्जुन वेलजाळी
मो.९०४९५२२२४०

# सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?

लोकमान्य टिळक हे भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या पहिल्या पर्वातील काँग्रेसचे जहाल मतवादी चळवळीतील अग्रणी नेते. केसरी व वर्तमान पत्रातून जुलमी व अत्याचारी ब्रिटीश सत्तेविरुद्ध जळजळीत लेख लिहून भारतीयांमध्ये असंतोष निर्माण केला. म्हणूनच त्यांना भारतीय असंतोषाचे जनक असेही म्हटले गेले होते. स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ह्या चतु:सूत्रीचा त्यांनी पुरस्कार केला. ब्रिटिशांच्या दडपशाहीच्या वरवंट्याखाली सशस्त्र सामान्य भारतीय जनता व क्रांतिकारक तरुण / तरुणी नाहक बळी जातील म्हणून स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतीकारकांना सहकार्य करून त्यांचेवर प्रहार / अन्याय झाल्यास त्यांना संरक्षण देण्याची नैतिक जबाबदारी लोकमान्य टिळकांनी घेतली होती.



लोकमान्य टिळकांनी ब्रिटिशांच्या अन्याय्य धोरणे व अत्याचारी कृत्ये व राज्यकारभाराचा प्रसार भारतीय लोकांमध्ये करून देण्यासाठी वेळोवेळी केसरीमध्ये ब्रिटीश राजवटीविरुद्ध अन्याय्य वास्तव परिस्थितीचे दर्शन घडवणारे जळजळीत अग्रलेख लिहून भारतीयांचे म्हणणे मांडले. संपूर्ण ब्रिटीश साम्राज्यात गाजलेला त्यातलाच एक अग्रलेख म्हणजे दि. ६ जुलै १८९७ या दिवशी लोकमान्य टिळकांनी लिहिलेला, 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ?' हा अतिजहाल अग्रलेख. ब्रिटीश सत्तेचा सुलतानी जुलमी वरवंटा भारतीय जनतेवर फिरत असतांनाच पुणे, मुंबई शहरात १८९६ साली प्लेगच्या साथीचे अस्मानी संकट आले. संपूर्ण पुण्यात प्लेगची साथ पसरली होती. त्यात अनेक लोक बळी गेले. पुण्यातील ही साथ अशीच सुरू राहिली, तर हिंदुस्थानातून बोटीने येणारा माल प्लेगच्या संसर्गाच्या भीतीने कुणी घेणार नाही. ब्रिटीश सत्तेचा भारतातील व्यापार बुडेल; म्हणून इंग्लंडमध्ये खळबळ उडाली. या प्लेगवर तेव्हा काही औषधही उपलब्ध नव्हते. काही शतकांपूर्वी लंडन शहरात या साथीने धुमाकूळ घातला होता. पुण्यात प्लेगची साथ पसरल्यानंतर ब्रिटीश सरकारने या साथीच्या नियंत्रणासाठी १८९७ चा आपत्ती निवारण ( संसर्गजन्य रोग ) प्रतिबंधक कायदा लागू केला. या कायद्यानुसार ब्रिटीश प्रशासनाला साथीचा रोग नियंत्रणासाठी विविध अधिकार मिळाले. हे अधिकार पोलीस आणि लष्करी अधिकाऱ्यांनी तारतम्याने वापरणे अपेक्षित होते, पण त्यावेळी पुण्याचा कलेक्टर असलेल्या रँड नावाच्या अधिकाऱ्याने कायद्याची कडक अंमलबजावणीचे आदेश दिले, त्यामुळे प्रशासनातील अधिकारी मनमानी करू लागले. एखादी व्यक्तीला प्लेगचा आजार झाल्याची शंका आल्यास तिची इच्छा असो वा नसो, तिला सरकारी हॉस्पिटलात भरती केले जात असे. प्लेगचे रुग्ण शोधण्यासाठी ब्रिटिश अधिकारी रँड याचे सैनिक पुणेकरांच्या घरात घुसत होते. घरातील विविध खोल्या, देवघरात सामानाच्या तपासणीच्या नावाखाली लुटालूट करत होते. सामानाची, देवघरातील मूर्तींची फेकाफेक करत, घरातील स्त्रियांवर अत्याचार करून त्यांची अवहेलना करू लागले. उगीचच संशय घेऊन बरेच सामान जाळून टाकत होते. रुग्णालयात भरती करण्यासाठी लोकांना फरफटत नेत होते. ब्रिटिश अधिकारी व सैनिक हे देवघर - स्वयंपाकघरात पायातल्या जोड्यानिशी शिरत होते. देव बाहेर काढून रस्त्यावर फेकत होते. स्वयंपाकघरातील लोणच्याच्या बाटल्या रोग होईल म्हणून उकिरड्यात टाकत होते. घरातील वृद्ध तसेच स्त्रियांवर अत्याचार केले गेले. रोगग्रस्त लोकांसोबतच अनेक निरोगी लोकांनाही केवळ संशयावरून रोग्यांच्या छावणीत हलविण्यात आले. या सर्व संतापजनक परिस्थितीवर लोकमान्य टिळक यांनी वेळोवेळी लोकांना संदेश व कलेक्टर रँडविरुद्ध लेख लिहिले; परंतु ब्रिटीश अधिकारी व पोलीस यांच्यावर कोणताही परिणाम झाला नाही. अन्याय, अत्याचाराने परिसीमा गाठली. या परिस्थितीचा व अन्याय, अत्याचाराचा बदला म्हणून चाफेकर बंधुंनी ( दामोदर, बाळकृष्ण व वासुदेव ) बापूराव व महादेव रानडे यांच्या सहकार्याने अत्यंत गुप्तपणे नियोजन करून रँड हा व्हिक्टोरिया राणीच्या हीरकमहोत्सवी राज्याभिषेक दिनाच्या मेजवानीला शासकीय हाऊसवर आला असता गोळीबार करून त्याचा २२ जून १८९७ रोजी खून केला.

कलेक्टर रँडच्या खुनानंतर इंग्रज अधिकाऱ्यांनी मारेकऱ्यांना शोधण्यासाठी जंग जंग पछाडले. झडत्या, निरपराध्यांचा संशयाने छळ सुरू केला. साथ नियंत्रणासाठी पाचारण करण्यात आलेल्या लष्कराचा खर्च म्हणून प्रतिष्ठित लोकावर अन्याय्य कर बसवले. इंग्रज अधिकाऱ्यांना विरोध करणाऱ्या लोकांना पकडून त्यांना तुरुंगात टाकून त्यांचा छळ करायला सुरुवात केली. लोकांच्या घराच्या झडत्या, स्त्रिया व निरपराध लोकांचा छळ व त्यांचेवरील खटले हा त्रास नको; म्हणून दामोदर व बाळकृष्ण हे चाफेकर बंधु स्वतः पोलिसात हजर झाले. त्यांचेवर खटला चालवून त्यांना फाशी देण्यात आले. या सर्व पार्श्वभूमीवर लोकमान्य टिळकांनी आपल्या केसरी वर्तमानपत्रातून 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय !' हा अत्यंत जळजळीत असा अग्रलेख लिहून इंग्रज अधिकाऱ्यांच्या अन्याय व अत्याचाराचा निषेध केला.

याच प्लेगच्या साथीत अडकलेल्या लोकांचे हाल सावित्रीबाई फुले यांना सहन झाले नाहीत. त्यांनी प्लेग पीडितांसाठी पुणे शहराजवळील ससाणे यांच्या माळावर हॉस्पीटल सुरू केले. त्या स्वतः रोग्यांना धीर देऊ लागल्या. त्यांच्या घरी जाऊन त्यांना भेटू लागल्या. कुटुंबीयांना आधार देऊ लागल्या. पण रोग्यांचा उपचार करता करता सावित्रीबाईंनाही प्लेगने गाठले आणि त्यातच त्यांचाही मृत्यू झाला.

लोकमान्य टिळकांची देशनिष्ठेने व चाफेकर बंधुंच्या असीम त्यागाने व आत्मबलिदानाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी रक्ताचे बलिदान द्यावे लागते हा क्रांतीविचार आसेतूहिमाचल रूढ होऊन भारतीय क्रांतीलढ्याची सुरुवात झाली व भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी देशभर क्रांतीकारक निर्माण झाले, म्हणून भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यांचा त्याग व बलिदान आपण आजच्या स्वातंत्र्याच्या वातावरणात जगणाऱ्या भारत भूच्या प्रत्येक सुपुत्रांनी ध्यानात घेऊन राष्ट्रसेवेचा वसा घेतला पाहिजे. (केसरीतील अग्रलेख दिनांक ६/७/१८९७)

**हसा ना गडे**

दत्ता जोशी
मो.८३२९९२२०२७

# मी दळण आणायला जातो

त्या दिवशी रविवारी माझ्या मुलीला पाहायला पाहुणे येणार होते म्हणून आम्ही अतिशय आनंदात होतो. सगळेजण लवकर उठलो होतो. मुलीची तयारी सुरू होती. अचानक बायकोला आठवलं घरामध्ये पिठाचा एक कण पण शिल्लक नाहीये. मग ती शक्य तितक्या हळू आवाजात माझ्या अंगावर खेकसून म्हणाली,

अहो, उठा ना. लोळत काय पडलात. थोड्याच वेळात ते पाहुणे येतील. चक्कीवर दळायला गहू घेऊन जा. आणि तिथेच उभा राहून पीठ घेऊन या. आणि हो ऐका ना त्याला म्हणावं नीट बारीक दळून दे.

मग बायकोने अंदाजे गहू पिशवीत भरून दिले आणि सांगितलं की आता लगेच जा. सकाळी खूप गर्दी असते मग तो वजन करत बसत नाही. त्यामुळे थोडे जास्त गहू मोफत दळून मिळतात. आणि हो त्याला आठवणीने सांगा की मागच्यावेळी नेलेले पीठ खूप कमी भरलं होतं.

अगं, पण मागच्यावेळी मी कुठे गहू नेले होते दळायला. मी तर पहिल्यांदाच चाललोय.

अहो, तुम्हाला समजत कसं नाही हो. असं बोलावं लागतं. नाहीतर तो पीठ कमी देईल तुम्हाला. आणि हो दळताना नीट लक्ष राहू द्या. पूर्ण पीठ पडून जाई पर्यंत त्याला दुसरं दळण टाकू देऊ नका. आणि हो त्याने चक्कीचा दगड कधी लावून घेतला होता हे पण त्याला अगोदर विचारा, कारण मागच्या वेळच पीठ कचकच लागत होतं असं सांगा.समजतय ना मी काय काय सांगते आहे ते.

अग, पण मी तर पहिल्यांदाच चाललोय ना चक्कीवर. मी ती गव्हाची पिशवी तिच्या हातातून घेत म्हणालो.

अहो, नुसतं बोलायला काय झालं हो तुमचं. तो काय लगेच तुम्हाला लगेच पीठ आणून दाखवायला सांगणार नाही. आणि हो आपलं दळण टाकल्यानंतर चक्की च्या तोंडावर हाताने ठोकायला विसरू नका. आणि हो दळणाचे पैसे देताना त्याला भाव विचारा. त्याने काहीही भाव सांगितला की तुम्ही एकदम सर्वस्व लुटलं गेल्या सारखा भयानक चेहरा करा आणि चवताळून ओरडा की अरे भाव कधी पासून वाढले. मागच्या आठवड्यात मी दळण घेऊन गेलो होतो.

अग, पण मी तर आज पहिल्यांदाच जातो आहे. मी काकुळतीने बोललो.

काय बोलाव तुम्हाला. अहो नुसता बोलायचं आहे. तो काय तुम्हाला लगेच रिसीट मागणार नाही मागच्या दळणाच्या भावाची.

बायकोने दिलेले व्यवहारी सल्ले ऐकून मला खरं तर खूपच टेन्शन यायला लागलं होतं. दळण दळून आणणे एवढी कठीण गोष्ट असते याची मला कल्पनाच नव्हती.त्या पेक्षा तयार पीठच का आणू नये असं मी नुसतं बोलून दाखवल्यावर तिने मुलगी लग्नाची झाली आहे. असा वायफळ खर्च केला तर तिच्या लग्नात पैसे आणणार कोठून. माझ्या माहेरच्या भरवश्यावर राहू नका बरं. या गोष्टी बायको इतक्या तळमळीने सांगत होती की जर मी तयार पीठ आणण्यासारखा खर्च सुरु केला तर माझ्या पोरीच्या लग्नात कितीतरी लोकांना उपाशी राहावं लागेल असं विदारक चित्रं माझ्या डोळ्यसमोर चमकून गेलं.

पण या दळण आणतानां इतक्या गोष्टी कशा लक्षात ठेवणार म्हणून मी विचार केला की या सगळ्या गोष्टी कागदावर लिहून घेऊन जाऊ. मग एक कागद घेतला त्यावर बायकोने सांगितलेल्या सगळ्या गोष्टी क्रमवार लिहून काढल्या. म्हणजे उदाहरणार्थ आटे का भाव कब से बढ गया है श्र पिछले टाईम का आटा बहोत कच कच लगा था वगैरे वगैरे.

मग मी शेव्ह वगैरे केली. इन बिन केली. स्प्रे शिंपडला. बूट घातले. आणि गव्हाची पिशवी दळणा साठी हातात घेतली. मला बायकोने एवढं नटून-थटून दळण आणायला जाताना पाहिलं आणि तिच्या पायाची तिडीक मस्तकाला गेली.

अहो, तुम्ही दळण आणायला चालले आहात. मुलगी बघायला नाही. काढा ते कपडे आणि घरात नेहमी वापरायचा शर्ट आणि पायजमा घालून जा. असं बूट बीट घालून तुमच्या घराण्यात कुणी दळण आणलं होतं का हो कधी. तिने लगेच आमच्या घराण्याचा उद्धार केला.मला बघायला आले तेंव्हा चांगले कपडे घालून यायला पाहिजे होते, तेव्हा नेमके बिन इस्त्रीचे कपडे घालून आले होते. नशीब माझ्या मैत्रिणीने तेव्हा समजावंलं मला म्हणून नाहीतर मी नकारच देणार होती तुम्हाला . बायकोचा स्वगत सुरू झालं. असं तिला नको त्या वेळी नको त्या गोष्टी आठवत राहतात.अशा वेळी आपण जन्मजात बहिरे आहोत आणि आपल्याशी कोणी बोलतच नाही असं समजून मी निवांत ऐकत राहतो.

मग मी तातडीने घातलेले कपडे बदलून पायजमा शर्ट घातला. आणि गव्हाची पिशवी घेऊन चक्की वर जायला निघालो.

चक्कीवर जाण्याचा माझा पहिलाच प्रसंग . प्रत्यक्षात तिथं कोणीच दिसलं नाही. पण माझ्याआधी तिथं बरेच लोक दळण घेऊन आले होते असं दिसलं. कारण रांगेने दळणाचे डब्बे ठेवलेले होते. मोठ्याने गिरणीचा खटखट आवाज होत होता. सगळीकडे पिठाचा थर जमलेला होता. कोळ्याची जाळी देखील पांढरी दिसत होती आणि तो दळणारा भैया केसापासून पायापर्यंत पूर्णपीठाने भरलेला होता. फक्त त्याचे डोळे आणि तोंड वेगळंच दिसत होतं.

मला बघितल्यावर तो एकदम ओळखीचं का हसला आणि म्हणाला, आओ साहाब कैसे हो श्र

मला तो ओळखतो हे पाहून मला तर आश्चर्याचा धक्काच बसला. घरात जावू दे पण बाहेर साहित्यिक म्हणून मला एक पीठगिरणी वाला भैया ओळखतो म्हंटल्यावर जरा इगो सुखावलाच. मी त्याला विचारलं तुम मुझे पहचानता है श्र हा साहाब हमेशा का कस्टमर को कोन नही पहचानता श्र त्याने मला जमिनीवर आणून ठेवलं.

मी त्याला म्हणालो, गेहू का आटा बनाने का है श्र

तो म्हणाला, हो जाएगा साब रखके जावो. आधा घंटे मे बन जायेगा. मला एकदम आठवलं बायकोने सांगितलं होतं. कितीही वेळ लागो, तिथेच बसून दळून आणायचं. मी म्हणालो, नहीं नहीं अभी चाहिये श्र मै रुकता हू श्र

तो म्हणाला, ठीक है श्रथोडा रोकना पडेगा साब श्र असं म्हणून त्याने मला चक्कीच्या बाहेर बसायला एक खुर्ची दिली. मी त्याच काम बघत बसलो.लेखक म्हणून मी असा नेहमी निरीक्षण करत बसतो, पण लोकांना वाटतं मी मुद्दामून टक लावून, मान वळवून वळवून पाहात असतो.

त्याच दळण दळण्याचे काम सुरू होतं. डबे ठेवून गेलेल्या दळणाच त्याने वजन केलं आणि जास्त झालंल पीठ बाजूला काढल.

अरे ये क्या करता है, मी त्याला विचारलं. तो म्हणाला, साहब लोक जादा गेहू लाते है और कम वजन बताते है इसलिये जो जादा होता है वो मै निकाल लेता हू श्र

लेकिन ऐसा करना ठीक नहीं है श्र असं मी बोललो तेंव्हा तो नुसता हसला हातातल्या लोखंडी पान्ह्याने चक्कीवर आवाज करत राहीला. एकापाठोपाठ एक तो दळण टाकत होता. पिठ ईकडे तिकडे उडत होत.

अचानक त्याच्या फोनची घंटी वाजली. अच्छा अच्छा, ठीक है, अभी आता हू असं म्हणतं फोन संपल्यावर तो मला म्हणाला साब एक काम करो ना श्र मै अभी आता हू श्र मेरे घर में मेहमान आनेवाले है श्र आप दस मिनिट के लिए दुकान सम्हालीये ना श्र

तू जेव्हा मला असं म्हणाला तेव्हा मला धोक्याची जाणीव झाली. मी त्याला म्हणालो अरे, मी कसं काय सांभाळू. मला यातलं काहीच माहित नाही. तुम्हाला साहेब काही टेन्शन घ्यायचं कामच नाही. तुम्ही नुसतं एक दळण संपला की दुसर दळण टाका आणि खालचा डब्बा बदलवा. एकदम सोप आहे आणि मी जे दळण टाकतोय ना तेच मुळे दहा मिनिटे चालू राहील. तुम्ही फक्त कोणी कस्टमर आलं ना तर थांबवून ठेवा. मी लगेच गेलो आणि लगेच आलो. काही अवघड नाही साहेब तुमच्या सारख्या शिकल्या सवरलेल्या माणसाला. आणि जास्तच त्रास झाला तर हे मेन बटन बंद करून टाका की झालं. या साहेब इकडे. इथं या लाकडी फळीवर उभे रहा. ही टोपी घाला म्हणजे तुमच्या डोक्यात पीठ पडणार नाही. चला साहेब येतो त्याने माझ्या डोक्यात टोपी घातली आणि तो घाईघाईने निघून गेला.

आता त्या गिरणीत मी एकटाच होतो. खट खट आवाज करत दळण दळलं जात होत. दुसऱ्या लोकांना मी दुकानात नवीन आहे हे कळू नये म्हणून मी हातातल्या पान्ह्याने चक्कीवर जोरजोरात आवाज करायला सुरुवात केली. मी पाहिलं होतं तोही असंच करत होता. पीठ इकडे तिकडे उडत होतं मला मजा वाटायला लागली डोके टोपी घातली होती म्हणून केसावर पेठ पडत नव्हतं पण तोंडावर चष्म्यावर पिठाच्या थर जमा लागले. आता मला त्या कामात मजा वाटायला लागली. एवढे छान वाटत होतं की रिटायर झाल्यानंतर एखादी पिठाची गिरणी टाकावी असं मला वाटायला लागलं. नकळत मी गाणं गुणगुणायला लागलो.

तेवढ्यात एक बाई कमरेवर पिठाचा डबा घेऊन आली. माझ्यासमोर आदळून म्हणाली अरे भैया इतना आटा वजन मे कम कैसे हुआ श्र

मला क्षणभर कळत नाही ती काय बोलतेय नुसता बघत राहिलो.

मुझे क्या पता श्र मी म्हणालो.

अरे चक्की तो तेरी है ना श्र तिने विचारलं.

नहीं, मेरी नहीं है श्र माझं ओरडून उत्तर.

तो तू यहा क्या कर रहा है श्र तिने चवताळून विचारलं.

तेवढ्यात दुसरी बाई आली. दुसरा डब्बा माझ्यापुढे आदळून म्हणाली, अरे भैया पीठ मे क्या पत्थर डाले क्या आटा कितना कचकच लगता है श्र

मला हे समजत नव्हतं की चक्कीवाल्याशी हिंदीतच का बोलावं लागतं. कदाचित तसा नियम असावा.

मी त्या दोन्ही बायांकडे नुसता पाहत राहिलो. त्या दोघी हातवारे करून ओरडायला लागल्या,अरे कुछ तो बोलो, फुकट मे पीस के दिया है क्या श्र ये आटा बदल के दो श्र

मला तर काय बोलावं ते सुचत नव्हतं. गिरणी च्या आवाजात मला ऐकू जावं म्हणून त्या बायका हातवारे करून येव्हढया जोरात बोलत होत्या की त्यांचं बोलणं मला ऐकू जायच्या ऐवजी बाहेरच्या दुसरा लोकांनाच जास्त ठळक ऐकू जायला लागलं आणि हळूहळू गर्दी वाढू लागली.

काही काही लोकं तर

भैया हटाव, खळ्ळ खटाक करो, अशा घोषणा द्यायला लागले.

मी त्यांना शांत राहण्याचा सल्ला देत होतो. परंतु कोणी माझा ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हता. जिकडे तिकडे पीठ उडून उडून माझ्या



चष्म्यावर पीठाचा थर जमा झाला होता. आणि मला अंधुक दिसायला लागल होतं. पायावर तोंडावर सगळीकडे पीठ पीठ जमा झाल होत. दुकानदाराचा कितीवेळ झाला तरी ठिकाणा दिसत नव्हता. तेवढ्यात अजून एक बाई आली आणि तिला अर्जंट दळण पाहिजे होत. दिसायला बरी होती म्हणून मी इतर सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून तिच दळण घेतलं.

तेव्हढ्यात एक बाई आणि मुलगा, आप कोन हो और यहा क्या कर रहे हो असं विचारायला लागल्या वर, मी म्हणालो मै चक्कीवाला हू, असं मी म्हटल्याबरोबर ती बाई एकदमच बिथरल्या सारखी झाली.

अम्मा ये अपने अब्बा नहीं है श्र तो मुलगा भोकाड पसरून रडायला लागला. ती बाई तर कहा गया मेरा शोहर, ठीक तरह से बता, नहीं तो पुलिस को बुलावुंगी श्र या बाईचा आवाज तर फारच मोठा होता आणि ती अंगावर धावून आल्यासारखी वाटली.आता तिथून पळ काढण्या शिवाय मला पर्यायच राहिला नाही. बाहेर पडता पडता माझा पाय कशाला अडखळला तेच समजलं नाही. एका फळीवर दळणाचे दळून ठेवलेल्या पिठाचे डब्बे ठेवलेले होते. सगळे क्रमाने येवून अंगावर पडले. मी नखशिखांत पिठात न्हाऊन निघालो. आणि सुसाट बाहेर पळत सुटलो.

कसा दिसत होतो देव जाणे. पण चक्की पासून घरापर्यंत एरियातली एकूण एक कुत्री जीव तोडून तोडून माझ्यावर भुंकत होती. बिल्डिंग मध्ये कसाबसा पोहोचलो. बेल वाजवली.

घरी आलेल्या पाहुण्यांनी दार का उघडावं बरं. नेमकं मुलीच्या होणाऱ्या सासूबाईने दरवाजा उघडला. मी सरळ आत घुसलो. माझा तो भयंकर अवतार पहिल्यावर तर त्यांची दातखिळीच बसली. त्या होणाऱ्या व्याह्याच्या अंगावर जावून पडल्या. त्या व्याह्याला स्वतःचा तोल सांभाळता आला नाही. त्याच्या डोक्याला हे टेंगुळ आलं. त्या गडबडीत त्याचा पाय नवऱ्या मुलाच्या पायावर पडला. सगळी पाहायला आलेली फॅमिली रिमिक्स करायला लागली.

ही कुठे गेली होती कुणास ठाऊक.त्या गडबडीत मी बाथरूम मध्ये पळालो.

अंघोळ करता करता अचानक डोक्याला तोंडाला साबण लावलेला असतांना अचानक पायजाम्याच्या खिशातून लग्नात गुलाबी साडी नेसलेल्या हिच्या मामेबहिणीची रिंग टोन ऐकू येते. मी तसाच फेसाळलेल्या तोंडाने फोन घेतो आणि जगातला सगळ्यात मधुर आवाज माझ्या कानात पडतो, जिज्जू कुठं आहात तुम्ही. लवकर या ना पाव्हणे आलेत घरी. पण तू कुठं आहेस. मी तर इथंच आहे. मी लाडात येवून बोलतो. जरा बाथरूम जवळ येवून उभी राहा पाहू. मी तिला सांगतो.

आणि खसाखसा डोकं पुसत दरवाजा उघडतो सामोरं बायको गोड चेहऱ्याने माझं स्वागत करायला उभी असते.

काय हो माझा फोन उचलायला काय धाड भरते का तुम्हाला.दहा फोन केले असतील. एकही उचलला नाही. शेवटी तिचं म्हणाली ताई माझ्या फोनवरून कॉल करून बघ. कदाचीत उचलतील जिजाजी. आणि खरंच तिचा बरोबर उचलला की हो आणि बाथरूम जवळ भेटायला बोलावता का. घरात प्रसंग काय आणि यांच चाललंय काय. देवा देवा... बरं एक सांगा पीठ कुठं आहे. आता या प्रश्नाला काय उत्तर देवू.

आणि तिची ती गुलाबी साडीवाली बहीण कसं बनवलं एका माणसाला अशा नजरेने खवचट सारखी हसत असते.

बाहेर व्याही विहीण बाई अजूनही एकमेकांना बिलगून धीर देतं बसले आहेत. कोणीतरी पांढरं पांढरं भूतांसारखं आत धावत गेल्याच त्यांना अंधुक अंधुक आठवतंय.

## शब्दझुला

### करु नव्याचं स्वागत

गत वर्षाला निरोप
करु नव्याच स्वागत
आम्ही भारती आम्हाला
रुढी नव्या अवगत।।धृ।।
रुढी सार्या अवगत
मानवाच्या ज्या हितात
रुढ सार्या त्या होतात
पहा माझिया गीतात।।१।।
उजळली वाट आम्ही
नव्या वर्षाची जुन्यात
दिवाळीच्या दिवसांत
उजळून ही दिव्यात।।२।।
धरा काय आकाशात
उंच उंच औकाशात
आकाशात प्रकाशात
नित्य नव्या विकासात।।३।।
गोड बोलण्याने करु
नववर्ष सुरुवात
नव्या मराठी वर्षाचं
अन् स्वागत चैत्रात।।४।।
नव्या वर्षाची पहाट
चैतन्यात फुलवतं
चैत्र पालवीच्या परी
नित्य नवी पालवित।।५।।
दसर्याच्या पाठोपाठ
जातं वर्ष ही सरत
सरत्याला ही स्मरत
करु नव्याचं स्वागत।।६।।

**–सौ.मंगला रोकडे**
एरंडोल, मो. ९३७१९०२३०३

### गृहिणी

समरसणे संसारी पतीच्या हीच जीची कहाणी।
गृहीत धरतो सदा जीला ती तीच खरी गृहिणी ।।
कसरत तारेवरची करुनी सावरते संसारा ।
राब राबते रात्रंदिन अन् आवरते पसारा ।।
कुटुंबवत्सल तीच असे अन् तीच गृह मानिनी ।
गृहीत धरतो सदा जीला ती तीच खरी गृहिणी ।।१।।
जन्मजात पाचवीस पुजले दु:ख जीच्या पदरी ।
सरी सुखाच्या बरसावूनी ना कुणी तिला आदरी ।।
ना लंकेची पार्वती म्हणतसे कुणी न रामराज्ञी।
गृहीत धरतो सदा जीला ती तीच खरी गृहिणी ।।२।।
आज करुया जगून तिच्यास्तव खरा तिचा सन्मान ।
इच्छापूर्ती तिची करुनी तो राखू तिचाही मान ।।
संसारास्तव उरो पुरो अन् ठरो ही जगत जननी।
गृहीत धरतो सदा जीला ती तीच खरी गृहिणी ।।३।।

**–विवेक करंजीकर, पुणे**



### उभ्या दहात

श्वास हा किरणातून
गव्हांकुर शांत शांत
सायंकाळची हुरहूर
दाटली उभ्या देहात
नितळ निरभ्र नभ
घरट्यात वाट पाहते
आर्तहाक सभोवार
प्रार्थना हळूच उतरते
क्षितीजडोंगर निळे
फुलांचे ताटवे मिटले
पंखावर गार गारवा
हळूच डोळे मिटले

**–बी.अनिल**

### गझल

शब्द ओठी असावा मधासारखा
ऐकणारा खुलावा फुलासारखा
वाटला ना कधीही कुणासारखा
अन समजतो स्वतःला नटासारखा
सुप्त माझ्या गुणांची मला ना खबर
शोध घेते खुळी मृगजळासारखा
नेम डोळ्यातुनी थेट होता असा
काळजावर निशाणा सुऱ्यासारखा
प्रेम करतो तरी राग करतो अता
वागतो बाप हट्टी मुलासारखा
कासवाच्या गतीने मिळाला धडा
धावतो रोज जो तो सशासारखा
स्पर्श आई तुझा भेटला ना तसा
आवडावा तलम कापडासारखा
भाळले सावळ्याशा मुखावर तुझ्या
रास रचतो कुठे मोहनासारखा
स्त्रोत फेसाळणाऱ्या नदी सारखा
प्रेम ओसंड मनावर दुधासारखा

**–मंजुषा पटेल**
धुळे, मो. ९४२३९८२००५

### मन्हा मामानी पोर

मन्हा मामानी पोर दखा
वज्री जीव किद्राई र्हायनी
उठ-सुट जधय-तधय ती दखा
तिन्हा माहेरले पई जाई र्हायनी मन्हा.....
सुदं सांगो तिले ते, तिले कुदं वाटंस
भांडा-कुंडा फेकंस, आदय-आपट करंस
बठी कोपराम्हा रडी-कढी र्हायनी मन्हा.....
नही नोकरी माले, पन शेत मया से
निंदा-टुपाना तिले भारी कट्टाया से
भीतले डोकं ठोकीसनी, कुडापा करी र्हायनी मन्हा....
जरा बोलो तिले, ते, ती म्हनस पई जासू
जरा मारं ठोकं ते म्हनस मी मरी जासू
लगे घरानास्ले बलावनं धाडी र्हायनी मन्हा
नही सोडंस जरासा त्या मोबाईलना नान
रिचार्ज माराना पाह्यरे मन्ह वाजी ग्ये पानदान
आखो माले न्यारं निंघाले सांगी र्हायनी मन्हा....
बोला करु मी काय? काही सांगा उपाय
कोन्ह्या रावन्या करू कोन्हा धरू मी पाय
चांगला सौसारनी माटी करी र्हायनी मन्हा....

**–शिवाजी साळुंके**



डॉ. सृष्टी संजय पोद्दार
BDS (Reg no - A-44123)
मोबाईल नंबर- 9209888484

गुढीपाडवा व हिंदू नव वर्ष निमित्ताने
मोफत दंत तपासणी शिबिर

दिनांक ३०/०३/२०२५ व ३१/०३/२०२५
Free Dental checkup
वेळ सकाळी १० ते ०२ व दुपारी ०४ ते ०८

सेवा
- दात साफ करणे
- रुट कॅनल
- वेडेवाकडे दात सरळ करणे
- दात काढणे
- बत्तीशी बसवणे
- कृत्रिम दात बसविणे
- लहान मुलाचे दंत उपचार
- दातातील कॅव्हिटीवर उपचार
- मुख शस्त्रक्रिया

शिबिरातील तपासणी झालेल्या रुग्णांना उपचारांमध्ये 20% सूट

दिप अर्चना डेंटल केअर
दातांचा दवाखाना
ठिकाण:
दिप अर्चना डेंटल केअर, गणपती पॅलेस च्या समोर, मालेगाव रोड, धुळे..


# धर्मवीर राजे संभाजी महाराज यांना बलिदान दिना निमित्त धुळ्यात भाजप पदाधिकाऱ्यांतर्फे अभिवादन

**धुळे, दि.२९- धर्मवीर संभाजी महाराजांच्या बलिदान दिनानिमित्त आज दि.२९ रोजी सकाळी येथील शंभुतीर्थावर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला भाजप महानगराच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.**

याप्रसंगी महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर तसेच धुळे शहर विधानसभेचे आमदार अनुप अग्रवाल, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, ज्येष्ठ नेते विजय नाना पाच्छापुरकर, हिरामण गवळी, नंदु ठोंबरे, भाजपा उपाध्यक्ष संजय बोरसे, राजेंद्र खंडेलवाल, माजी महापौर सौ.प्रतिभाताई चौधरी, जयश्रीताई अहिरराव, नागसेन बोरसे, यशवंत येवलेकर, पृथ्वीराज पाटील, निशाताई चौबे, मोहिणी धात्रक, पवन जाजू, प्रकाश उबाळे, किशोर जाधव, भगवान चौधरी, शरद चौधरी, बबन चौधरी, अनिल थोरात, तुषार भागवत, दिलीप शितोळे, शिवाजीराव चौधरी, सुहास अंपळकर, जयंत वानखेडकर, अरूण पवार, पंकज धात्रक, विनोद खेमणार, सचिन पाटील, शेखर कुलकर्णी, पंकज विंचु, चंद्रकांत महाजन, प्रितेश अग्रवाल, प्रकाश पोळ, सुनिल कोठावदे, विक्की सोनार, दिनेश शर्मा, मयुर सुर्यवंशी, महेंद्र शेणगे, जिवन शेंडगे आदी उपस्थित होते.






# एसव्हीकेएम अभियांत्रिकीत कॅन्सर जागरुकता कार्यक्रम

**धुळे, दि.२९- श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ मुंबई संचलित धुळे येथील एस.व्ही.के.एम. अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातर्फे महाविद्यालयाच्या मुलींसाठी कॅन्सर जागरुकता कार्यक्रम घेण्यात आला.**

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी डॉ.सोनल धांडे (कॅन्सर मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट, सेलक्यूर कॅन्सर सेंटर प्रायव्हेट लिमिटेड, नाशिक) उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या माध्यमातून मुलींना कॅन्सरच्या लक्षणांपासून बचाव, लवकर निदान, तसेच उपचारांच्या पर्यायांची माहिती देण्यात आली. कॅन्सरविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा ठरला. डॉ.अंकुश कुमार मुदळकर यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले तर विभाग प्रमुख डॉ.विशाल मोयल हे कार्यक्रमाचे संयोजक होते. प्राचार्य डॉ.निलेश साळुंके यांच्या मार्गदर्शना खाली इंजिनिअरिंग विभागातील सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.

# गळफास घेवून एकाची आत्महत्या

धुळे, दि.२९- शिरपूर शहरातीलकिसन पार्क लेआऊट ह.मु. संजिवनी कॉलनी निमझरी नाका येथील अठ्ठावीस वर्षीय इसमाने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, आकाश किशोर काकडे (वय २८) हे राहत्या घरात गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आले. त्यांचा मित्र अक्षय काळे व घरमालक केशव पाटील यांनी खाली उतरवून खाजगी रूग्णवाहिकेतून शिरपूरच्या कॉटेज हॉस्पिटल येथे उपाचारासाठी दाखल केले. डॉ.रूपसिंग पावरा यांनी तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी शिरपूर शहर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

## श्रीराम मंदिर संस्था आग्रारोड धुळे आयोजित चैत्र नवरात्र व रामनवमीचे कार्यक्रम

१) गुढीपाडवा दि.३०/०३/२०२५ पासून रोज सकाळी ६ ते ८।। श्री.शरदकाका खोपडे आणि त्यांचे सहकारी विठ्ठल मंदिर ग.नं.४, भजनी मंडळ यांचा काकड आरती कार्यक्रम.
२) दि.३१/३/२०२५ पासून दि.५/४/२०२५ पर्यंत रोज दुपारी ४ ते ५।। कलावती आई भजनी मंडळ यांचे भजन.
३) दि.१/४/२०२५ संध्याकाळी ६ ते ८ धुळ्यातील प्रख्यात गीतकार श्री.प्र.अ.पुराणिक सर लिखीत आणि प्रा.श्रीमती विणा कमलाकर यांनी गायलेले गित रघुनंदन हा कार्यक्रम.
४) दि.२/४/२०२५ रोजी संध्याकाळी ५।। ते ७ सुवर्णकार भजनी मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम.
५) दि.३/४/२०२५ स्वरसंवाद श्री.डॉ.शेखर रुद्र आणि सहकारी यांचा भक्तीसंगिताचा कार्यक्रम संध्याकाळी ७ ते ९.
६) दि.४/४/२०२५ श्री.रामदेवबाबा भजनी मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम- संध्याकाळी ८ ते १० मंदिरासमोर.
७) दि.५/४/२०२५ श्री श्री श्री रविशंकर प्रणित आर्ट ऑफ लिव्हींगचा कार्यक्रम. सादरकर्ते- आदरणीय ममता दिदी गिंदोडिया आणि सहकारी. मंदिरासमोर.
८) दि.६/४/२०२५ सकाळी १० ते १२ श्री.संजीव बुवा कुलकर्णी यांचे रामजन्माचे किर्तन- मंदिरासमोर.
९) दि.६/४/२०२५ संध्याकाळी ५ ते ८ जय बाबारी भजनी मंडळ श्री.विनोदजी शर्मा यांचे रामभक्तीपर गिते.
१०) दि.७/४/२०२५ सकाळी काल्याचे किर्तन.

आपला विश्वासू
**अभय रामकृष्ण नाशिककर (अध्यक्ष)**


**ऑफिस भाड्याने देणे**
गल्ली नं.५ येथील नाकोडा कॉम्प्लेक्स जवळील दोन कॅबिन्स, वॉशरुमसह ६०० चौ.फू.जागा भाडे कराराने देणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**बंगला विकणे**
वाखारकर नगर
अग्रवाल नगर
डोंगरे महाराज नगर
वल्लभ नगर
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**हॉल भाड्याने देणे**
डॉक्टर, हॉस्पीटल, बँका, ऑफिस, पतपेढीसाठी हॉल भाड्याने देणे आहे
१) दत्तमंदिर चौकात पहिल्या मजल्यावरील २५०० चौरस फूट.
२) स्टेशनरोड तळ मजल्यावर ५ कॅबिन, फर्निचर, वॉशरुमसह १८०० चौरस फुटाचा हॉल.
३) मालेगावरोड वरील तळ मजल्यावर २००० चौरस फुटाचा हॉल.
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**दत्तमंदिर चौकात प्लॉट विकणे**
देवपूर दत्त मंदिर चौक परिसरात ३०००, ५००० आणि ६५०० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉटस् विकणे**
एस.व्ही.के.एम. शाळेजवळ सुसज्ञ वसाहतीतील प्लॉटस् विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**पाहिजेत**
दुकान कामासाठी हेल्पर व अकाऊन्टंट पाहिजे.
पगार १०,०००/१२,०००
श्री स्वामी समर्थ ग्लास हाऊस
देवपूर, धुळे
8329837739

**पाहिजेत**
होलसेल रेडीमेड ड्रेस कापड दुकानावर कामासाठी सेल्समन/हेल्पर तरुण मुले पाहिजेत.
वयोगट १८ ते ३५ वर्ष
8999243620
8275223627

**पाहिजेत**
पेट्रोल पंपासाठी अनुभवी व होतकरु मेहनती मुले पाहिजेत
श्री स्वामी समर्थ पेट्रोल पंप
परिमल कॉलनी, पंचायत समि तीपुढे, सिस्टेल स्कूलजवळ, धुळे
9322931357

**पाहिजे**
हैद्राबाद शहरात घर व मुलगा सांभाळण्यासाठी घरगुती बाई/विधवा बाई/एकटी असणारी महिला पाहिजे.
आकर्षक पगारावर
9665980290
9422772778

**मोफत प्रवेश**
सावली वृद्धाश्रमात मोफत प्रवेश! बेवारस, अंध, अपंग, मनोरुग्ण प्रवेश! आजी-आजोबा यांची सेवा करण्यासाठी २ जागा
-: संपर्क :-
आप्पा खताळ
सावली वृद्धाश्रम, मोहाडी, धुळे
9209789661

**भाड्याने देणे आहे**
कंपनी, सुपरशॉप, कोचिंग क्लासेस, कुरियर, लॉजिस्टीक शोरुम किंवा ऑफिससाठी उत्तम बिल्डींग चाळीसगाव रोड चौफुली, एनएच-३ महामार्गाजवळ भाड्याने देणे आहे
-: संपर्क :-
9421463064
9423979064

**प्लॉट विकणे आहे**
तिरुपतीनगर, गव्ह. पॉलिटेक्निक जवळ, हायवे लगत, प्लॉट नं.५५, सर्व्हे नं.१०६/१, एरिया १६१४ स्क्वे.फूट प्लॉट विकणे आहे
-: संपर्क :-
9860745458

**पाहिजेत**
होलसेल मेडीकल दुकानामध्ये कामासाठी महिला/मुले/मुली पाहिजेत.
१) कॉम्प्युटर ऑपरेटर/अकौन्टंट
२) सेल्समन बाहेरगावासाठी
३) हेल्पर/मदतनिस माल वाटपसाठी
संजय मेडीकल्स
गल्ली नं.२, धुळे
8483032975

**पाहिजे**
MI, Inter सर्व्हिस सेंटरमध्ये मुलगा लावणे आहे
कार्तिक हाऊस
देवपूर, धुळे
9422289612

**हॉटेल भाडेतत्वावर देणे आहे**
धुळे-सुरत बायपास वरील जिल्हा रुग्णालयाजवळील राजेंद्र वालचंद शिंदे (पहेलवान) यांची हॉटेल भंडारा परमीट रुम बिअर बार असलेली हॉटेल भाडेतत्वावर देणे आहे
-: संपर्क :-
राजेंद्र वालचंद शिंदे (पहेलवान)
9421155555





LG Life's Good
बँकेच्या क्रेडीट कार्डवर EMI सुविधा उपलब्ध !
BAJAJ FINSERV HDB FINANCIAL SERVICES
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे: 1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 2382222
57 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763



नव्या वर्षाची सुरुवात.. नवीन संधीं सोबत..
'घर आणि व्यवसाय' दोन्हींसाठी
परफेक्ट लोकेशन
GK ARCADE
1 BHK, 2 BHK & 3 BHK
Luxurious Flats & Shops
ताबा लगेचच रेडी पझेशन
फ्लॅटस् 25Lac | शॉप्स 15Lac
पासून पुढे*
मोजकेच शॉप्स् व फ्लॅटस् शिल्लक.. त्वरा करा..
नियम व अटी लागू



सुविधा : प्रशस्त पार्किंग, सोलर रुफटॉप सिस्टिम, सुरक्षिततेसाठी CCTV कॅमेरा, लिफ्ट बॅटरी बॅकअपसह
जी.के.आर्केड
व्यवसाय व निवासी भव्य कॉम्प्लेक्स
साईट : जी.के.आर्केड, प्रा.र.का.केले वाक्श्रवण विकास विद्यालयासमोर, नकाणे रोड, छत्रपती हॉस्पिटल जवळ, देवपूर, धुळे
Maha RERA No. P49800050308
88881 92677, 94227 92677


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०